# GURUKUL INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

## Quarterly


March – 2015 | Issue – I | Volume – II

ISSN No. 2394-8426



| Managing Editor | Chief Editor |
| --- | --- |
| **Dr. Prakash N. Somalkar** | **Mr. Mohan Hanumantrao Gitte** |
| Principal, Gurukul Mahavidhyalaya, Nanda.<br>At. Nanda, Tah. Korpana, Dist. Chandrapur.<br>Pin – 442917<br>Mob. No.: +91 94 22 13 7816 | At. Dattapur, Post. Ghatnandur,<br>Tah. Ambajogai, Dist. Beed.<br>Pin – 431519<br>Mob. No.: +91 92 73 75 9904 |

| Email ID's | Website |
| --- | --- |
| info@gurukuljournal.com<br>help@gurukuljournal.com | http://gurukuljournal.com/ |

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

## Index


| Paper No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Indian Banking System Challenges & Changes | Dr. Pravin M. Chandragiriwar | 1 to 5 |
| 02 | औरंगाबाद-जालना परिसरातील मध्ययुगीन जलसाठे | डॉ. पठाण झेड. ए. | 6 to 11 |
| 03 | वाई येथील मध्ययुगीन महागणपती मंदिर | प्रा. गित्ते सुनिता हनुमंतराव | 12 to 16 |
| 04 | बाबासाहेब आणि बौद्धधम्म | डॉ.परमानंद बा.बावनकुळे | 17 to 21 |
| 05 | आदिवासी समाज आणि जादू | डॉ. आनंद के. भोयर | 22 to 26 |
| 06 | Translation : The Recreation | Prof. Prakash Khade, Arundhati Mali | 27 to 29 |
| 07 | Struggling Against the Stereotypical Images - The Role of Social Activism and Literature in Maharashtra | Siddharth Shrihari Maske | 30 to 37 |
| 08 | वाणिज्य शिक्षणात पुन:संशोधन व पुनर्रचनेची गरज–एक वास्तव | डॉ. प्रशांत म. पुराणीक | 38 to 43 |
| 09 | अन्नसुरक्षा कायदा : भारतातील समस्या व उपाय | प्रा. आरती डी. महेशकर | 44 to 49 |
| 10 | Priestly Conflict In Ekamraka-Lingaraja | Dr Kailash Chandra Dash | 50 to 59 |
| 11 | जिवती तालुक्यातील आदिवासींच्या चळवळी | प्रा.चतुरदास जानबा तेलंग | 60 to 63 |
| 12 | जिवती तालुक्यातील आदिवासींचे सांस्कृतीक व शैक्षणिक जीवन | प्रा.गंगाधर वी.लांडगे | 64 to 67 |
| 13 | An intuitional Repository (IR) is a digital archive | Sable Mahendra Shantaram | 68 to 71 |
| 14 | Towards A Casteless Society | Prof. Shrikant D. Panghate | 72 to 75 |
| 15 | Watershed Development : The Need of Era | Prof. S. M. Kolhapure Dr. S.S. Ambhore | 76 to 83 |
| 16 | औरंगाबाद जिल्हयातील पर्जन्यमानाचा भूमिउपयोजनावरील परिणाम,एक अभ्यास | जाधव जालु कन्हैयालाल, मेंजर डॉ.अनिगुंटे व्ही.एस. | 84 to 88 |
| 17 | जागतिक व भारतीय विद्यापीठे : एक तुलना | डॉ. विद्याधर बन्सोड | 89 to 96 |
| 18 | B2B For Competitive Market place | Prof. Rajesh S. Dongare | 97 to 101 |
| 19 | महाराष्ट्र राज्यातील काही निवडक फळांबाबतचे संशोधन | प्रा.डॉ. सौ. शरयु मनिष पोतनुरवार | 102 to 105 |
| 20 | डॉ. आंबेडकरांची राज्यसमाजवादाची संकल्पना आणि भारतीय संविधान | प्रा. संजय के. लाटेलवार | 106 to 109 |
| 21 | The Life And Vision Of Dr. Babasaheb Ambedkar | Dr. Pandharinath L.Dhengle Ravindra D. Hajare | 110 to 116 |
| 22 | चंद्रपुर जिल्ह्यातील सोयाबीन पिकविनाऱ्या शेतकऱ्यांचा उत्पादनविषयक स्थितीचा-एक अभ्यास | डॉ. सुधीर न. बोढे | 117 to 123 |
| 23 | पर्यावरण आणि आर्थिक विकास | डॉ.एस.एस.कावळे | 124 to 126 |
| 24 | डॉ.आंबेडकर विश्व चेतना के सन्दर्भ में | डॉ. रमेशकुमार गवळी | 127 to 130 |
| 25 | Physiochemical analysis of some commonly used Edible and Hair oil preparations | Kurve M.B. | 131 to 140 |
| 26 | यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांचे निर्णय प्रक्रियेतील स्थान | शुभांगी अ. भोयर & डॉ.सौ. अपर्णा ढोबळे | 141 to 144 |
| 27 | नव्या माणसाचे आगमन : शैली विचार | प्रा. मिलिंद साठे | 145 to 149 |
| 28 | गडचिरोली जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांनी केलेल्या विकास षीर्श – कृशी व संलग्न सेवा अंतर्गत योजनांचे अध्ययन | डॉ.तात्याजी काशीनाथ गेडाम | 150 to 158 |
| 29 | Social Work Research in India | Mr.Raju V.Kasare | 159 to 164 |

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# INDIAN BANKING SYSTEM CHALLENGES & CHANGES

**Dr. Pravin M. Chandragiriwar**
Bhavbhuti Mahavidyalaya,
Amgaon Dist. Gondia

**ABSTRACT**

The Liberalization Process initiated by the Government of India nearly one-a half decades ago has brought tremendous changes in the financial services sector. The banking sector in particular, is undergoing a rapid change to face the challenges posed by new developments due to the entry of private banks and foreign banks into India. Within the world of banking, needs have changed and so has the basic nature of banking services that they require. The way banks meet these needs and the framework within which they are delivered have, as a result, changed tremendously. Accordingly, the banks have had a adapt to a host of new phenomena ranging from regulatory issue, risk management and new technology to globalization, consolidation and branding. Banks in India, in the new era of global competition, have to concentrate on three important areas for sustained development viz., Technology, the Customer and Consolidation.

Until 1980s, banks in India had only one delivery channel which is branch presence. Suddenly, technology has opened up option for various delivery channels. Technology aided products like ATMs , point of sale devices , anywhere Banking , Smart Cards Internet Banking , WAP Banking , etc. have given the customer to choose his channel-based strategy to serve the customer Over the years , technology has brought a sea-change in the functioning.

## INTRODUCTION

Banking sector plays in as important role in the development of country. Prior to nationalization, the functions of bank were limited. The Indian banking registered tremendous in post-nationalization era.

Since the beginning of 1991, there has been a sea change in the role, organization, scope and activity level of the Indian financial sector . The Indian banking industry has witnessed a rapid growth after economic reforms from regulated to deregulated market economic and defined a new role for banks. Narasimham Committee (1991) had recommended several reforms in banking sector as reduction of reserve requirement, de-regulation of interest rates , introduction

of prudential norms , allowing entry of private sector banks etc . The winds of changes gained momentum in the last few years such as globalization and opening up of financial services under World Trade Organization (WTO). It is expected that the banking sector will undergo mergers and acquisition, globalization, of operation , development of new technology and universalization.

**CHALLENGES BEFORE THE BANKING SYSTEM**

In the early phase of reforms the planer decided to improve the financial system by emphasizing the following 5 core areas.

1. Correct and improve the macroeconomic policy setting within which banks operate.
2. Introduction of prudential norms relating to income recognition and capital adequacy.
3. To improve the financial health of the system.
4. To eliminate the element of competition so as to cultivate competitive spirit in the banking system. This will help for functioning of public and private sector banks.
5. To establish a sound financial infrastructure by Building dynamic financial institution to assist the banking system by improving the quality of supervision audit, technology and legal framework.
6. To improve the general level of management competencies in the banking system for which efforts are made to cultivate quality human resources and develop effective OD policies.

**THE CHALLENGES AHEAD**

The bank in India are facing certain challenges their destiny and survival in the years to come. The prudent approach of bank in India has always prevailed and which is the real reason of their success and survival. Banks have always shown a high level of flexibility and willingness to cope up with change in spite of a sea change in the financial environment. Indian bank have survived and have grown basically because of their strong understanding of Indian market and positive towards change mechanism. There are certain challenges which banks are facing and shall face in the competitive market oriented environment.

**THE CHALLENGES ARE**

**Organizational transformation though appropriate change mechanism.**

The liberalization policy is not an unmixed blessing . There are banes and booms when a policy offers certain advantages to any segments it automatically throws some challenges the capacity to accept the challenge will decide the extent to which the organization can avail the benefits. The new age banking is more competitive and dynamic in nature the entire approach is focused at retailing existing markets at one level and acquiring new at the other. The concept of relationship banking is becoming extremely popular one way in which competition is manifesting itself is in the nature of bank customer relationship. The on slot of competitive forces has generated a new trend away from traditional banking relationships forward the transactions banking. It is necessary for banks to develop a mechanism which will help them to retain and acquire new customers. The task is enormous and cannot be done within a single yardstick measure.

The principle measure to bring in the banking system is organizational transformation. The old approach on administering the organization needs to be changed; banks have to adopt a more employee friendly and more positive outlook. They should show keenness in cultivating proactive managerial philosophy staff at all levels has to be encouraged to acquire new skills and willing to use new techniques and technology. No war is won with old weapons. Hence organization transformation should result using technology to improve organizational efficiency policy formulation and developing a right mindset.

**Competitive advantage is the key.**

There is no mercy and philanthropic consideration in the competitive market. Everyone wants to win but in the ware there are select winners. No one can win without having a competitive advantage. Banks needs to build superior strategies and skills systems and structures in relation to their competitors. As rightly said by porter" competitive advantage grows fundamentally out of the value if firm is able to create for its buyers that exceeds the cost of creating it. Balue is what buyers are willing to pay and superior values stems from offering lower prices than competitors for equivalent benefits of providing unique benefits. Competitive advantage gives cost leadership and differentiation. Banks will have to understand their customers in the light of the competition they are to face they must realize the changed phase of market so as to meet the levels of competition. No two customers are ideal and identical. Hence developing suitable competitive strategies for each segment happens to be the key for success.

Without gaining a competitive advantage banks won't be able to survive. The real challenge is therefore not merely improving profitability but cultivating a spirit of competition and element of organizational excellence, which is the core aspect of competitive advantage.

**CONCLUSION**

A broad over view of the progress achieved by the Indian banking sector in the post-reform era over past two decades or so reveals or so reveals that there is no doubt regarding significant progress on several front in the banking arena , the enduring challenge of ensuring much greater financial inclusion , is the mightiest one facing the banking industry and so the RLB, as the regulator and supervisor of the banking industry . The functions have changed according to changing polices of the bank during reform period . It is necessary to educate customer properly while selling products to ensure that the customer knows what is the getting into . Thus Banks need to engage in responsible banking and lending which together with credit counseling and customer education would prevent over-leveraging of customers the most powerful means of increasing inclusiveness, or of democratizing finance, is to increase competition. This means not only increasing the number of providers of services, but also improving the information and capabilities of the users. The fact that many new mortgage borrowers in the US did not understand the contracts they were signing was a contributor to the subprime crisis . Thus , Dr. Reddy is absolutely correct that improving financial literacy is important though this must be seen in a context where even basic literacy is often missing . An overhaul of regulation is sorely needed ,however , so that regulation is aimed at increasing disclosure , and allowing for appropriate escape clauses , rather than controlling suppliers of financial services so heavily that competition is stifled , along with all other incentives for efficiency .

**BOOKS AND REFERENCES**

1. Indian Banking Moving Towards Information Technology –R.K. Uppal
2. E-Banking In India –Challenges And Opportunities R.K Uppal And Rimpi Jalana
3. Modern Banking In India –O.P.Agarwal
4. Banking Theory And Practices –K.C. Shekhar And Lekshmy Shekhar
5. Basis Of Banking And Finance-Dr.K.M.Bhattacharya And O.P.Agarwal
6. Changing Scenario Of India Banking - R.K. Uppal
7. Transformation through Information Technology

8. www.google.com
9. www.infai.com
10. www.yahoo.com
11. India Today
12. The Financial Express
13. The Economic Times

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# औरंगाबाद-जालना परिसरातील मध्ययुगीन जलसाठे

**डॉ. पठाण झेड. ए.**
(उपप्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक)
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बदनापूर, जि. जालना. (महाराष्ट्र)

मोसमी हवामानाच्या प्रदेशात राहणाऱ्या महाराष्ट्रीतन लोकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असून सततचा दुष्काळ आणि जलसिंचनाचे साठे कमी असल्यामुळे जेमतेम व्यवसाय करून आपली उपजिविका भागवावी लागत होती. म्हणून प्राचीन काळापासून विहीरी, कालवे, कुंडे बारवे खोदले जात. डोंगराचे पाणी वाहून जाऊ नये म्हणून नाल्यावर नद्यांवर बांध टाकून ‘तलाव बांधली गेली.तलाव निर्मितीत भारतातील आदिवासी जमातीचे योगदान महत्त्वाचे आहे. गोंड,ढिमर,भिछ,पारधी, प्रधान,भोई, माळी, कोळी या जातींनी अनेक तलाव बांधल्याचे पुरावे इतिहासात आहेत. बुऱ्हाणपूर येथील ‘जलव्यवस्था’ सातपुडा पर्वत रांगीतून भूमिगत पाणी आणून वस्तीला पाणीपुरवठा करण्याची पद्धत पारधी या जातीने केला व त्यानंतर मोगल काळात त्यात सुधारणा होऊन  मध्ययुगातील पाण्याची उत्तम व्यवस्था म्हणून त्यांची प्रचिती झाली.[१]

१३ व्या शतकात मुस्लिम सुफी संतांनी दौलताबाद ते गुलबर्गा या भागात अनेक तलाव, विहिरी बारवे बांधल्याचा उल्लेख दिसतो त्याचे जीर्ण शीर्ण अवशेष आजही दौलताबाद परिसरात दिसतात.[२] पर्यावरण व पाण्याची समस्या सुफी संतांनाही जाणविलेली दिसते. त्यांनी आपल्या आश्रमात दर्गाहभोवती मोठमोठी विहिरी, तलाव व बारव खोदलीत. विहिरी पक्क्या विटांनी बांधून खालून पाणी आणेपर्यंतच्या पायऱ्या त्या विहिरींना आहेत. पायऱ्या प्रत्येक विहिरीला असून, जागोजागी विशिष्ट अंतरावर कमानीचा आकार देण्यात आलेला आहे. स्थानिक भाषेत त्याला  ‘बारव’ म्हणतात.[३] अशा बारवा दौलताबाद, खुलताबाद, औरंगाबाद येथे आढळतात. दौलताबादच्या पूर्वेला एक बारव अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आढळते. तिच्यावर आजही बागायती शेती केली जाते व शेजारील वस्तीला पाणी पुरवठा होतो. तिला खाली उतरण्यासाठी गोलाकार पायऱ्या बांधून जागोजागी ‘कमानी’ आहेत. शिवाय त्या बारवच्या पूर्व दिशेला आतून छोटीशी मशिद तयार करण्यात आलेली दिसते.[४]याशिवाय खुलताबाद व औरंगाबाद येथे कागजीपूरा, लेबर कॉलनी, एस. टी. कॉलनी, शहागजं, चौराह, खाराकुंआ, किलेअर्क

याठिकाणी आजही त्या बारवा आहेत.[५] याशिवाय काही दर्गाहजवळ तलाव, धरणे दिसतात. त्या तलावात उतरण्यासाठी लांब पायऱ्या बांधलेल्या दिसतात. डोंगराचे पाणी बांध टाकून अडविले जाई व त्याचा फायदा शेती व पिण्याच्या पाण्यासाठी केला जात असे. अशी तलावे बनीबेगम का तालाब, फतियाबाद तालाब, कागजीपुरा तालाब, मालिवाडा तालाब, इदगाह तालाब, छत्री तालाब, परियों का तालाब इ. आजही खुलताबाद , दौलताबाद या परिसरात आहेत.[६] औरंगाबाद येथील बाबा पलंगपोष यांनी हर्सूल डोंगरातून भूमिगत पाणी आणले व जागोजागी त्याला हवेसाठी ‘बम्बे’ बनविले. हे भूमीगत पाणी एका भिंतीवरून खाली हौदात सोडले. पाण्याच्या धारेसमोर लोखंडी पाते लावलेली पाट्यांची चक्की ठेवण्यात आली. धारेसमोर ठेवताच पाते फिरू लागली व आतील चक्कीचे पाते फिरू लागली. अशा पद्धतीने पिठ दळण्याची पाणचक्की निर्माण करून दीनदलितांना, उपेक्षित घटकांना, प्रवाशांना पिठ व अन्न मिळू लागले. त्यावर अन्न छत्रालये चालू लागली. त्यांची आजही अवशेष पाणचक्कीत दिसतात.[७] ही कल्पना अ.नगरच्या मलिक अंबरने वापरली आहेत, जटवाडा, डोंगररांगेतून भूमिगत पाणी आणून शहराचा पाणीपुरवठा केला. त्यामुळे त्याला ‘नहेर अंबरी’ नाव आजही आढळते. अशा नहरी औरंगाबाद शहरात जागोजागी पहावयास मिळतात.[८] यावरून मध्य युगात सुलतान बादशहापेक्षा लोकसेवा, उपेक्षितांच्या सुख-दु:खात सहभागी होऊन लोकोपयोगी कामे सुफी संतांनी केलेली दिसतात व त्यांच्या समाजप्रबोधन कार्यामुळे, जनसेवेमुळे स्थानिक भाषेत साहित्य रचल्यामुळे ते लोकोपयोगी संत बनले. म्हणूनच आजही सर्व जाती-धर्मातील लोक त्यांना पुजतात. त्यांच्या यात्रा, उत्सव उरुस भरवितात. तलाव, विहीरी, बारवे मुख्य कथन मंदिराच्या शेजारी नदीच्या काठावर बांधलेली दिसतात. अशा विहिरी सातवाहन, राष्ट्रकुट यादवाच्या काळात भरपूर प्रमाणात झाल्या.[९] असाच एक तलाव ‘मोती तलाव म्हणून जालन्यात प्रसिद्ध आहे. अहमदनगरच्या निजामशाहीचा वजीर मलिक अंबरने जालन्यापासून ६ कि.मी. अंतरावरील घाणेवाडी येथे कुंडलिकानदीवर एक तलाव बांधून तेथील पाणी भूमिगत स्वरूपाने मोती तलावात आणला व मोती तलावातील पाण्याचा उपयोग नगरातील पेयजल पुरवठा म्हणून केला. याचे जिर्णशीर्ष अवशेष आजही जालना शहरात आढळतात.[१०]

मोठी विहिर म्हणजेच बारव होय. या बारवांना पायऱ्या असतात. जनतेने पेयजल पायऱ्या उतरून घ्यावयाचे असते. बहुतांश मंदिराच्या बाजूला बारव बांधल्या जात होत्या. त्यामुळे वसाहतीच्या पाणीपुरवठ्यांची समस्या दूर होत असे. मध्ययुगात यादव, मुस्लिम काळात बारवे, विहिरी बांधल्या गेलीत. त्या राजकीय आश्रयातून जनकल्याणासाठी व सुफी संतांनी आपल्या परिने लोककल्याण

करण्यासाठी विहिरी खोदल्या. या दोन्ही प्रकारातून वस्तीतील लोकांचा पाणीप्रश्न सुटावा हा मुख्य हेतू व सर्वसामान्यांची सेवा करण्याची संधी त्यांना मिळत असे.[११] या विहिरी खोदण्यापूर्वी त्या परिसरातील भूजल स्त्रोतांचा अभ्यास केला जाई. बारवातील किंवा विहिरीतील जलसाठा कायम राहावा, त्याला बाराही महिने प्रतिकूल परिस्थितीत पाणी राहावे अशी रचना केली जात होती.[१२] अशा बारवा जालना जिल्ह्यात अंबड, हिरवली, इंडोली परिसरात आढळतात. साधारणत: बारव बांधण्याची रचना सर्वसामान्यपणे ‘बारवांच्या भिंतीवर  जमिनीतील पाण्याचा दाब पडू नये म्हणून भिंतीमध्ये ठराविक अंतरावर लहान लहान छिद्रे ठेवीत असत किंवा बऱ्याच बारवांच्या दगडाच्या सांध्यात पक्का चुना भरत त्यामुळे यातून पाण्याचा झिरपा होऊन पाण्याचा दाब वाढत नसे. बारवेच्या बांधकामाचा भार पेलू शकेल अशी पायाची रचना केली जात असे. एका थरावर दुसऱ्या थराची रचना करताना वरच्या थरातील दगड खालच्या थरातील दगडापेक्षा साधारणत: २ से.मी. मागे रचत असत. बांधकाम करत जसजसे वर येऊ तसतसा बारवेचा घेर वाढत जात असे. बांधकामाच्या वजनामुळे पडणारा दाब विस्तारित भागावर पसरत असे. सर्वसामान्य भूकंपाच्या धक्क्यामुळे या रचनेला धक्का बसत नसे. कारण खालच्या थरातील बाहेर आलेले दगड वरच्या थरातील दगडास घरण्यास  प्रतिबंध करतात. अशा जोडणीस अटकाव (उटंगळ) म्हणतात. काही बांधकामांमध्ये वरच्या दगडाचे टोक खालच्या दगडाच्या खाचेत बसविलेले असते किंवा दोन समांतर दगडांमध्ये उभी खाच करून त्यात शिसे किंवा तांबे वितळवून भरत. कोपऱ्यावरील दगड पडू नये म्हणून तो काटकोनात घडविलेला असतो. ऑफसेट जोडणीपद्धतीमुळे बारवेच्या प्रवेशाची रुंदी ही तिच्या तळाच्या पायरीच्या रुंदीपेक्षा जास्त असते. बारवेच्या दोन सोपानांमधील उंची एक ते दीड मिटरपेक्षा जास्त नसते. या तंत्रामुळे बारवाचे बांधकाम शतकानुशतके टिकून आहे.[१३] अशा दिसणाऱ्या बांधकामातील जालना जिल्ह्यातील बारवे म्हणजे रेणूका आईची बावी, महाद्वारी बारव, इंडोली बारव आणि अंबड येथील काही बारवांचा समावेश होतो. त्यांची खालीलप्रमाणे माहित सांगता येईल.

**रेणुकाआईची बावी**

जालना शहरापासून हिवरली या परिसरात श्री चक्रधर स्वामी आले. तेथे त्यांनी मुक्काम केला तेव्हा विहिरीतील देवता त्यांना येऊन भेटल्याची नोंद लिळाचरित्रात पूर्वार्ध ४८४ मध्ये नमूद आहे. या बारवेबद्दलची अख्यायिका म्हणजे देवी आसरा नवसाला पावणाऱ्या असल्याविषयीचे समज या परिसरात आहेत. नागवेशीजवळील ही बारव तीन प्रवेश असलेली १३×१३ मी. आकाराची आहे. तीन मुख्य

सोपान व कुंड अशी बारवेची रचना आहे. दक्षीण बाजूस प्रवेश ठेवलेला नाही. तेथे असलेल्या पहिल्या सोपानाच्यावर एक आयाताकार ओटा ठेवला आहे.[१४]

**इंडोली येथील बारव**

जालन्यापासून ६६ कि. मी. अंतरावर परतूर तालुक्यात इंडोलीची बारव आहे. ती चौरस आकाराची आहे. ३१×३१ मीटर असून चार प्रवेशद्वार व पाच सोपान असलेली बारव आहे. मुख्य सोपानावर असलेली संरक्षकभिंत २.२५ मीटर उंचीची आहे. यात स्वतंत्र अशा विविध देवळ्यांची निर्मिती केली असून, बारवेचे एकूण बांधकाम ८.९० मीटर उंचीचे आहे. संरक्षक भिंतीतून असलेला प्रवेश उत्तर व पश्चिम बाजूस सात पायऱ्यांचा आणि पूर्व-दक्षिण बाजूस आठ पायऱ्यांचा आहे. देवतांसाठी बांधलेले लहान मंदिर यांची रचना गर्भगृह (१.३०×१.३०मी.) त्यामुळे मुख्य मंडप (१.५०×१.५०मी.) अशी चारही बाजूंनी प्रत्येकी चार मंदिर व दोन देवकोष्ठ आहेत. यात एकूण १६ मंदिरे व १० देवकोष्ठ आहेत. यात एकूण १६ मंदिरे व १० देवकोष्ठ आहेत. यात एकूण १६ मंदिरे व १० देवकोष्ठे आहेत. येथील कुंड ३.३० × ३.३० मीटर आकाराचे आहे. बारव स्थापत्याच्या दृष्टीने रचना उत्कृष्ठ आहे.[१५]

**अंबड येथील बारवे**

सातवाहन कालापासून प्रसिद्ध असलेले अंबड शहर विविध वास्तूशिल्पाने, मंदिरांनी गजबजलेले आहे. मत्स्योदरीचे मंदिर आजही संपूर्ण जालना जिल्ह्यातील आराध्यदेवतेचे ठिकाण आहे. अंबड येथे एकूण ५ बारवा आहेत. त्यापैकी पुष्करणेश्वर मंदिराजवळील बारव, समशेर मशिदीच्य बाजूला असलेली बारव व मत्स्योदरी मंदिरासमोरील काबदी बारव आज चांगल्या प्रकारे अस्तित्वात आढळतात. अंबडच्या एकूण बारव प्रकारात चार प्रवेश असलेली, तीन प्रवेश असलेली, दोन मंडप असलेली व पोखरणी स्वरूपाची बारवे आहेत. अंबड शहरातील बारवेचा आकार पूर्व-पश्चिम २३.४० मी व उत्तर-दक्षिण१९.८० मी. आहे. ही बारव तीन टप्प्यात पूर्ण केलेली आहे. बारवेत पूर्व-पश्चिम बाजूला मुख्य प्रवेशद्वार आहे. १० पायऱ्या उतरल्यावर आपण मुख्य सोपानवर येतो. या ठिकाणी दक्षिण भिंतीस पूर्व-पश्चिम असा १५×३ मीटर आकाराचा मंडप आहे. हा आयाती मंडप सोळा स्तंभावर उभा आहे. बाहेरून तिन्ही बाजूने हा मंडप बंद असून, आतील बाजूने देवकोष्ठ आहे. या बारवेला स्थानिक लोक 'कावंदी' बारव म्हणतात. येथे आसरांची पूजा केली जाते. जावळाचे विसर्जन, चांदवा बांधने, पाळणा

सोडणे इ. धार्मिक कार्यक्रम येथे चालतात.[१६] येथील एका बारवाचे 'महाद्वारी' या नावाने ओळखली जाणारी चार प्रवेश असलेली चौरस बारव आहे. ही चार सोपान असलेली बारव आहे. या बारवेचा आकार पूर्व-पश्चिम २४.५० मीटरव व उत्तर-दक्षिण २६.६० मी. आहे. प्रवेशाची रूंदी २.५ मिटर आहे. प्रत्येक पायरी २० से. मी. रुंद व २५ से. मी. उंचीची आहे. एकूण प्रवेशाची रुंदी प्रारंभापेक्षा खालील टप्प्यात ४० से. मी. कमी होते. तसेच बारव स्थापत्यातील महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व बाजूंनी होत जाणारा समान विस्तार पहावयास मिळतो हे विशेष.[१७]

अंबडच्या पोखरणीत पूर्व-पश्चिम ५४ मीटर, उत्तर-दक्षिण ४८ मीटर असलेल्या विहिरीत पश्चिम बाजूस मंडप व लहान मंदिर आहे. तिला चारही बाजूस प्रवेश आहे.ती यादव काळात बांधली गेली असून, तीचा जिर्णोद्धार अहिल्याबाई होळकरांनी केला आहे. या बांधकामाचे वैशिष्ट्ये म्हणजे बारवेपेक्षा कमी रुंदीचे बांधकाम यात असून ती कमी खोलीवर असते. तळाशी जास्तीत जास्त मोठा ठेऊन कमी कमी टप्प्यात बांधकाम पूर्ण केलेले आहे. म्हणून तिला पोखरणी म्हणतात.[१८]

अशाच प्रकारच्या बारवा भोकरदन तालुक्यातही काही प्रमाणात आढळतात. या बारवा दोन प्रवेशद्वार असलेल्या आहेत. मात्र त्या शेजारील सिल्लोड तालुक्यातील बारवे एकच प्रवेशद्वार असलेल्या आहेत. अजिंठा गावातील गंगा, जमूना बारव आजही पिण्याच्या पाण्यासाठी प्रचलित बारव आहेत.

**निष्कर्ष**

१. आज जसे पर्यावरणातून जलव्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे तसे तीन-चारशे वर्षांपासून संतांनी, भारतीय समाजाने या संस्कृतीत याचा पाया घातला होता. म्हणूनच विहिरी, बारवे, तलाव निर्मिती झाली व जलसिंचनाचा उपयोग जनहितासाठी झाला.

२. १२ ते १४ व्या शतकातील या विहिरी व बारवाच्या स्थापत्य शिल्पावर देशीय, सुलतानी, तुर्की, इराणी, मोगली शैलिचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे बारव स्थापत्याला महत्त्व प्राप्त झाले.

३. जालना जिल्ह्यातील बारवा चौरस तर अष्टकोनी व दोन प्रवेशद्वार असलेल्या स्थापत्यशिल्पे आहेत. त्यावर मोटेची व्यवस्था करून किंवा रहाट बसवून मर्यादित जलसिंचनाद्वारे पुष्पवाटिका व शेतीचा विकास केल्याचे दिसते.

४. अशी जलस्त्रोते समाजाने, सरकारने जतन करावीत. ज्यामुळे पाण्याचा प्रश्न थोड्याफार प्रमाणात मिटेल व प्राचीन वास्तूचे संरक्षण होऊन त्याचे जतन करण्यासाठीच्या उपाययोजना होतील.

**संदर्भसूची**

१. 'बुऱ्हाणपूर का ऐतिहासिक महत्त्व व पर्यटन के आयाम', डॉ. पठाण झेड. ए. लेख, मध्यप्रदेश सरकार व भारतीय पर्यटन खात्याअंतर्गत झालेला बुऱ्हाणपूर येथील सेमिनार, ११ जानेवारी २००७.

२. दक्षिणेतील सुफी संतांनी केलेली समाजप्रबोधनाची मुख्य साधने, डॉ. पठाण झेड. ए. यांचा लेख.

३. डॉ. अरुणचंद्र पाठक, महाराष्ट्रातील बारव विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृष्ठ- ७

४. शेख मुबारक, मासुलिकल अबसार (फारसी), हैद्राबाद-१९६७, पृष्ठ- ३९-४०

५. औरंगाबाद डिस्ट्रिक्ट गॅझिटिअर १९८५, पृष्ठ-१४३

६. शेख मुबारक, मासुलिकल अबसार, हैद्राबाद-१९६७, पृष्ठ-४१

७. महमंद अब्दुल हई, तारिखे खुजिस्ता, औरंगाबाद, सबेरा प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद-२००४, पृष्ठ १०४-०७

८. डॉ. रमजान शेख, औरंगाबाद की जलव्यवस्था अर्थात मलिक अंबर का स्थापत्येशिल्प, नहरे अंबरी, शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृष्ठ -७१-७९

९. भारतीय जलसंस्कृती, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, पृष्ठ १७२-१७३

१०. औरंगाबाद डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर १८८५, म. शा. पृष्ठ -१३३

११. सुफीसंत

१२. भारतीय जलसंस्कृती, डॉ. मोरवंचीकर, पृष्ठ १९०

१३. कित्ता, पृष्ठ १९१

१४. कित्ता

१५. भारतीय शोधमुद्रा, डॉ. ब्रह्मानंद देशपांडे, पृष्ठ १२८

१६. प्रवेशयुक्त बारव, डॉ. अरुणचंद्र पाठक यांचा लेख

१७. दोन मंडप असलेली बारव, डॉ. अरुणचंद्र पाठक

१८. तीन प्रवेशयुक्त बारव, डॉ. अरुणचंद्र पाठक

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# वाई येथील मध्ययुगीन महागणपती मंदिर

प्रा. गित्ते सुनिता हनुमंतराव
इतिहास विभाग प्रमुख (स.प्रा.)
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद
ई—मेल- **sunitagitte@gmail.com**

पश्चिम भारत विशेषत: महाराष्ट्र हा उत्तर भारत व दक्षिण भारत यांच्या दरम्यान प्रदेश असल्याने प्राचीनकाळापासून सर्वसमावेशक राहीलेला आहे. त्यामुळे येथील राजकिय, सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिक प्रागणांमध्ये हा प्रभाव खोलवर जाणवतो. मंदिर स्थात्याबाबतीत उत्तर भारतातील नागर शैली व दक्षिण भारतातील द्रविड शैलीचा समन्वय असलेली वेसर शैलीतील अनेक मंदिरे या परिसरामध्ये निर्माण झाली. हाच समन्वयाचा वारसा पुढे मध्ययुगामध्येही चालू राहिला. त्याचीच एक वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ती म्हणजे महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील वाई येथील महागणपतीचे मध्ययुगीन मंदिर होय. हे मंदिर म्हणजे इस्लामी वास्तुशैलीत स्थानिक साहित्याच्या वापरातून निर्माण झालेली उत्कृष्ट कलाकृती होय.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वाई येथील मध्ययुगीन महागणपती मंदिराचा अभ्यास करण्यात आला आहे. यासाठी पुरातत्वीय व साहित्यिक तथ्यांसह जास्तीतजास्त प्रत्यक्ष स्थलदर्शन आणि मौखिक माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

मराठ्यांना जेंव्हा शस्त्र चालविण्याची शक्ती कळून आली आणि 'शहा' आपले बाहूले आहेत हे दिसून आले तेंव्हा त्यांची अस्मिता जागृत झाली. शहाजीराजांनी तलवारीच्या जोरावर स्वत:चे वैशिष्ट्य टिकविल्याच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवरायांचा जन्म झाला. त्यांनी मराठी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्याच धाडसी सूनबाई येसूबाई यांचा पुत्र छत्रपती शाहू (१७०७—१७४९) महाराजांच्या वेळी वाईवर सुरूवातीला मुघल व मराठे असा दुतर्फा अंमल होता.

साताऱ्यातील सावकार शामजीचा मुलगा भिकाजी रास्ते (नाईक) यांनी बाळाजी बाजीरावास (नानासाहेब पेशवे) आपली मुलगी गोपीकाबाई दिली आणि रास्तु घराण्याचे पेशवे दरबारी वजन वाढले. परिणामत: पेशव्यांनी रास्त्यांना १५ लाखांचा सरंजाम दिला. त्यामुळे रास्ते हे उत्तर पेशवाईत (१७६१—१८१८) वाईत स्थायिक झाले आणि जवळजवळ तेथील अनभिषिक्त राजे बनले. त्यांनी वाईचा सर्वांगीण विकास केला. आनंदराव भिकाजी रास्ते यांनी शक्कर बिबीचा बाग खरेदी केला व



गणपतराव भिकाजी रास्तु यांनी महागणपतीचे मंदिर (इ.स. १७६२) मध्ये कृष्णा नदीच्या पात्रातच बांधले आहे.

मंदिर बांधण्यासाठी पाषाणाला खाचा पाडून खोबणीत दुसऱ्या दगडाचे कुसू अडकवून तयार करीत आणि त्यांना घोटलेल्या चुन्याने सांधीत. या चुन्यामध्ये बरेच चिकट पदार्थ जसे डिंक, गोदणाचा पाला मिसळले जात होते. तसेच मेंढीचे केस सुध्दा मिसळत. कारण मेंढीचे केस कुजत नाहीत आणि त्यामुळे पाणी निसटून जाते. त्याचबरोबर शिशाचा वापर सुध्दा झाला होता. त्यामुळे छतातील फरशा खोबणीच्या सहाय्याने एममेकींच्या अटणीत घट्ट अडकविल्यामुळे त्या चिकटल्यासारख्या भासतात.



शिवाय त्यांना लोखंडी पट्टीचा मागे आधार दिलेला आहे.

या पूर्वभिमुख मंदिराचे विधान चतुरस्त्र असून वारंवार येणाऱ्या पुरांपासून संरक्षण व्हावे म्हणून गर्भागृहाच्या पश्चिमेकडील मागील भिंतीची रचना मधोमध त्रिकोणी आकार (बी पध्दतीची) देऊन नावेच्या टोकासारखी म्हणजे मत्स्याकार केली आहे. त्यामुळे पुराच्या वेळी पाणी दुभंगले (कापले) जाऊन पाण्याचा दाब कमी होतो व मंदिर सुरक्षित राहते.

गर्भगृहाचे क्षेत्रफळ ९ मीटर X ९ मीटर आहे. गर्भगृहास पूर्वभिमुख तीन दरवाजे व दक्षिण व उत्तर दोन मिळून एकुण पाच दरवाजे आहेत. पूर्वभिमुख मुख्य दरवाजा सर्वात मोठा म्हणजे पावनेतीन मिटर उंच व सव्वादोन मिटर रूंद एवढा आहे. गर्भगृहाची मधोमध उंची सु.७.५ मीटर भरेल. अर्धामीटर उंचीच्या चार मीटर लांब व ३.६० मीटर रूंद अशा चौथऱ्यावर काळ्या पाषाणातील भव्य गणपतीची बैठ्या आसणातील मुर्ती असून त्यांचे वाहन उंदीर प्रतिकात्मक आहे.

महागणपतीची ही मुर्ती जागीच कोरण्यात आली आहे. म्हणजे अगोदर मुर्तीसाठीचा पाषाण योग्य ठिकाणी ठेवला व नंतर गर्भगृह बांधले व मूर्ती कोरण्यात आली. गर्भगृहात अर्धामीटर उंच चौथऱ्यावर गजाननाची रेखीव बैठी एक मीटर व ८० सेंमी उंच व दोन मीटर रूंद डाव्या सोंडेची भव्य

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

मूर्ती आहे. तिची स्थापना शके १६९१ वैशाख शु. १३ रोजी करण्यात आली. मुर्तीचे स्वरूप बाळसेदार असल्यामुळे याला कदाचित ढोल्या गणती हे नामभिधान प्राप्त झाले असावे. ती एकसंध काळ्या पत्थरात (ब्लॅक साल्ट) खोदली असून हा दगड कर्नाटकातून आणला असून प्रथम तो थोडा मऊ असावा व पुढे हळूहळू कठीण झाला असावा. मात्र स्थानिक भाविकांचे मत आहे की, ज्या दगडाची मुर्ती कोरलेली आहे ती महाभारत काळामध्ये जेव्हा पांडव येथे राहण्यास होते तेव्हा भिमाने हा दगड डोंगरामधून काढला होता. भिमाने डोंगराला फावडे मारून डोंगरावरून काढला. तसेच सुरूवातीस मुर्ती फार मोठी होती. त्याच्या दर्शनासाठी ९ ते १० पायऱ्यांची शिडी होती तो दरवर्षी गव्हाच्या आकराएवढा कमी—कमी होतो. या मुर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे गणाधिपती म्हणजेच गणांचा अधिपती सेनापती अर्थात लढण्यासाठी सिध्द असल्याच्या अवस्थेत आहे. दोन्ही मांड्या पसरून पाय रोवून उकिडवा बसला आहे. यज्ञोपवितासह मोजके अलंकार घातलेले आहेत. त्यांत गळ्यातील हार, बाजूबंद व पायातील तोडे स्पष्ट दिसतात. मुर्तीची मागील अर्धचंद्राकृती प्रभावळ ३ मीटर ६३ सेंमी. उंचीची आहे. चारी हातात (डावीकडून) मोदक, परशु, पळी आणि दात ही आयुधे आहेत.



मंदिराच्या शिखराची पायथ्यापासून कळसापर्यंतची उंची तीन मीटर आहे. गर्भगृहाच्यावर एका पेटीसदृश सुमारे तीन मीटर उंचीच्या चौथऱ्यावर हे शिखर पक्या विटा व चुना यात बांधले असून ते समोच्यतादर्शक रेषांनी ज्या ज्या ठिकाणी चौथऱ्यावर टेकते त्याच्याखाली एक उमललेले सोळा पाकळ्यांचे भव्य कमळ आहे. किंबहूना या कमळातूनच हे शिखर वर आल्यासारखे लांबुन वाटते. या शिखराच्या चारी कोपऱ्यात मुळ शिखराच्या लहान प्रतिकृती आहेत. मुळ शिखर पिरॅमिड प्रमाणे काहीसे अणकुचीदार सुळक्यासारखे आकाशाकडे झेपावले आहे. त्यावर नलिकासदृश पागोळ्याप्रमाणे वर निमुळत्या होत जाणाऱ्या जाड चुने गच्चीतील कामट्या आहेत. या नलिका सदृश



चुनेगच्ची बांधकामावर एक भव्य उपडे कमळ आहे. कमळावर पाणी थोपवले जाते. त्यावर डमरी असून वर बदामी आकाराच्या कळसाऐवजी त्रिकोणी आकाराच्या खाचा पाडलेला आहे. त्यामुळे पुराचे पाणी ओसरून जाते.

गर्भगृहासमोर सुमारे १८.३३ मीटर लांब व सुमारे १२ मीटर रूंद क्षेत्रफळाच्या सभामंडप आहे. त्याच्या छताची उंची सु. ४.५ मीटर आहे. सभामंडपास दक्षिणोत्तर प्रत्येकी पाच कमाणी असून पुर्वेस मुख्य दरवाजाला लागून तीन कमाणी आहेत. तेरा कमणींचे दहा मच्छ अर्धस्तंभ व आठ मुख्य स्तंभ यांवर समतल छत आधारित आहे. देवालयाचे शिखर सु. २४ मीटर उंच आहे. हे बांधण्यासाठी सुमारे १,६०,०००/— रूपये खर्च झाले आहेत. सभामंडपाच्या कमानींवर इस्लामी वास्तुशैलीचा स्पष्ट प्रभाव दिसतो.

थोडक्यात प्रत्यक्ष पाहणी व उपलब्ध स्त्रोत साधनांच्या आधारे असे म्हणता येते की, वाई येथील मध्ययुगीन महागणपती मंदिर हे स्थानक बांधकाम साहित्यामधून इस्लामी वास्तुशैलीच्या प्रभावातून अवतरलेली समन्वित दृश्य अभिव्यक्ती आहे.

**निष्कर्ष :—**

१. वाई येथील मध्ययुगीन महागणपतीचे मंदिर कृष्णा नदीच्या पात्रामध्ये बांधले असल्यामुळे ते दिर्घकाळपर्यंत पाण्याचा मारा सहन करत सुरक्षित राहील याची दक्षता घेतली गेली होती.
२. या मंदिरातील महागणपतीची मूर्ती घडवलेला पाषाण कर्नाटकातून आणलेला नसून तो वाईनजीकचा असावा याबद्दल मौखिक पुरावे प्राप्त होतात.
३. हे मंदिर इस्लामी वास्तुशैली आणि स्थानिय वास्तुशैली यांच्या समन्वयाचे दर्शन घडविले.

**संदर्भ :—**

१. प्रा. द.ता.जोशी, डॉ. उषा जोशी, **'समग्र संतु माधवराव पगडी, खंड—२'** (इतिहास विभाग—अ), मराठी साहित्य परिषद, (आ.५) हैद्राबाद २०१० पृ. २५३.
२. सातारा जिल्हा **'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर,'** दाशैनिक विभाग, महाराष्ट्र शासन, १९९९, मुंबई प्र.
३. तत्रैव.
४. डॉ. देशपांडे सु.र., **'कला व संस्कृती वाई'** आस्था, पर्यावरणप्रेमी संस्था, वाई, २०११ पृ. ३७.
५. कित्ता पृ. ५९.
६. मौखिक माहिती, मुलाखत, **'श्री बबनराव गोखले,'** रास्ते यांचे वंशज व मंदिराचे विश्वस्त.

७. डॉ. देशपांडे सु.र. **'कला व संस्कृती वाई,'** आस्था, पर्यावरणप्रेमी संस्था वाई, २०११ पृ.३७.

८. कित्ता पृ. ३८.

९. कित्ता, पृ. ४१ व प्रत्यक्ष स्थलदर्शन.

१०.मौखिक माहिती, मुलाखत, **'श्री बबन गोखले,'** रास्ते यांचे वंशज व मंदिराचे विश्वस्त.

११. डॉ. देशपांडे सु.र., **'कला व संस्कृती वाई,'** आस्था, पर्यावरणप्रेमी संस्था, वाई, २०११ पृ. ४१.

१२. मौखिक माहिती, **'पी.एस.सुतार,'** भाविक स्थानिक, वाई.

१३. प्रत्यक्ष निरीक्षण.

१४. डॉ. देशपांडे सु.र., **'कला व संस्कृती वाई,'** आस्था, पर्यावरणप्रेमी संस्था, वाई,२०११ पृ. ६१.

१५. कित्ता, पृ. ५९ आणि प्रत्यक्ष निरीक्षण

१६. प्रत्यक्ष निरीक्षण

१७. डॉ. देशपांडे सु.र., **'कला व संस्कृती वाई,'** आस्था, पर्यावरणप्रेमी संस्था, वाई, २०११ पृ. ४१.

१८. कित्ता, पृ. ५९ आणि प्रत्यक्ष निरीक्षण.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# "बाबासाहेब आणि बौद्धधम्म"

डॉ.परमानंद बा.बावनकुळे
चिंतामणी महा.पोंभुर्णा,जि.चंद्रपूर
bparmanand@rediffmail.com

प्रस्तावना:—

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पिडीत शोषित समाजाला मुक्तीचा महामंत्र दिला. अखंड संग्रामातून शोषकांच्या हृदयात धडकी भरली. हा शोषित समाज मग दलितांच्या रुपात असो वा स्त्रीरुपात. त्यांना जिथे जिथे अंन्याय दिसला तिथे तिथे ते स्वयंभूपणे धावून गेले. त्या समस्येवर समूळ घाव घातला. त्याच बाबासाहेबांनी शेवटी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. खरे तर शोषितवर्गाच्या समस्यांवर बौद्ध धम्मात काही उपाय आहे का? याचा विचार करता याचे उत्तर नाही असे दिसेल. या समस्सेवर इलाज आहे तो आंबेडकरवादात. आंबेडकरांनी आजीवन संघर्ष केला. आणि शेवटी बौद्धाच्या शांतीच्या मार्गाचा अवलंब केला. 'संघर्ष' आणि 'शांती' हे दोन्ही परस्पर विरोधी तत्वे दिसतात. संघर्षाचे दुसरे नाव म्हणजेच बाबासाहेब. असे असताना त्यांनी शांतीच्या मार्गाला शरण जाण्यामागच्या कारणांचा विचार या निबंधातून घेतलेला आहे.

डॉ.भिमराव रामजी आंबेडकर भारताच्या सांस्कृतिक जीवनाच्या इतिहासातील वडवानलाचे एक नाव होय. सनातनी संस्कृतीच्या हृदयात केवळ नामोल्लेखानेचधडकी भरावी एवढे बेधडक असलेले हे नाव मानवतावादाचे पुरस्कर्ते तर धर्मवादाचे तेवढेच कट्टर पुरस्कर्ते आहेत. हे विसरता येत नाही.

बाबासाहेबांनुसार त्यांचे वडील रामजी आंबेडकर एक धार्मिक प्रवृत्तीचे व्यक्ती होते. घरात सात्विक वातावरण ठेवण्याचा वडिलांचा कसोसने प्रयत्न असायचा. घरात भजन, आरती, श्लोक, कबिराचे दोहे म्हणणे तसेच मुलांकडून म्हणवून घेणे. आदी गोष्टी मुलांकडून ते करून घेत. भिमरावांनाही लहानपणी हे वातावरण खूप आवडायचे. ते म्हणतात "आमचे कुटूंब गरिबीचे असले तरी त्यामधले वातावरण पुढारलेल्या सुशिक्षीत कुटुंबाला शोभेल असे होते. आम्हांमध्ये विद्येची अभिरूची उत्पन्न व्हावी, आमचे चारित्र्य सोज्वळ बनावे यासाठी आमचे वडील दक्ष असत. जेवायला बसायच्या आधी ते आम्हाला देवघरात बसवून भजने, अभंग, दोहे म्हणू लागत, त्यावेळी अतिशय गंभीर आणि पवित्र वातावरण निर्माण होत असे... त्याचप्रमाणे माझ्या बहिणीसुद्धा गोड गळ्यांनी जेव्हा अभंग म्हणत, त्यावेळी धर्म व धार्मिक शिक्षण मनुष्याच्या जीवनात अत्यंत आवश्यक आहे. असे मला सुद्धा पटत असे"[१] बाबासाहेब जेव्हा आपल्या गतआयुष्याकडे पाहतात तेव्हा त्यांना त्यांच्या बालपणीचे धार्मिक वातावरण भुरळ पाडणारे वाटते. कारण त्या बालवायात त्यांना आवडणारेच वातावरण त्यांचे घरी होते. सामान्य मुलांप्रमाणेच त्यांचेही बालपण अगदी सामान्य होते. सनातनत्वाच्या रुढींना खतपाणी घालणारे घरातील वातावरण आणि त्या वातावरणातच रममाण होणारे भीमरावांचे सर्वसामान्य बालमण असल्याचे उघड होते.

हळूहळू बालपण ओसरून भीमराव मोठे होऊ लागले. त्यासोबत समाजात त्यांना वेगळाले अमानुष अनुभव येऊ लागले. या अनुभवांची संगती लावण्यात त्यांची दमछाक व्हायची. माणसासारखी आपणही

माणसेच. परंतु आपणास प्राण्यांपेक्षाही हीन दर्जाची वागणूक का मिळावी? याची उकल त्यांना सापडत नव्हती. शाळा असो वा सार्वजनिक ठिकाणे. सर्वत्रच अस्पृश्यतेचे पिशाच्च सारखे त्यांच्या पाठीशी लागलेले होते. सार्वजनिक जीवनात येणारे अनुभव त्यांचे अंगांग पोळून कढत होते. हिंदू संस्कृतीत रुजलेले त्यांचे बालमन ह्या संस्कृतीपासून दुरावत चालले होते. संस्कृती आणि धर्माच्या नावावर जर माणसांची अवहेलना होत असेल तर असे धर्म काय कामाचे? हा प्रश्न त्यांच्या मनात कायम निर्माण व्हायचा. अशा धर्मात ज्यांना शूद्र मानले जाते. त्यांनी त्या धर्मात राहून काय उपयोग? हा विचार त्यांना भेडसवायचा कारण ही संस्कृती या शूद्र समाजाचा विकास होऊ देणार नाही. त्याला कायम गुलाम बनवून ठेवील. त्याचे पलिकडे जाऊ देणार नाही. म्हणून या माणसांनी हा धर्म सोडला पाहिजे. या धर्माची शूद्रांना गरज नाही. आपण धर्म सोडू म्हणून त्यांनी ३०जून १९३६ च्या मुंबईच्या अनुयायांसमोरच्या जाहीर भाषणात धर्म सोडून देण्याचा निर्धार व्यक्त केला. ''मी माझा निश्चय करून टाकला आहेमी धर्मांतर करणार हे निश्चित आहे... हिंदू धर्म माझ्या बुद्धिला पटू शकत नाही. हिंदू धर्म माझ्या स्वाभिमानाला रुचू शकत नाही.''चातुर्वर्ण्याधिष्ठीत हिंदू समाजात पावलोपावली होणारा अपमान, अस्पृश्यतेची वागणूक त्यांना या समाजापासून दूर ओढत होती. त्यांना या संस्कृतील पशूंपेक्षाही हीनपणाची वागणूकया समाजापासून दूर ओढत होती. ज्या समाजात पशूपक्ष्यांची पूजा केली जाते त्याच संस्कृतीत माणसांना मात्र पशूंपेक्षाही हीन वागणूक मिळते. हे त्यांच्या सारख्या स्वाभिमानी मनाला असहनीय अशीच बाब होती. अनादी काळाची ही ह्या समाजाची मानसिक गुलामगिरी बदलली पाहिजे ह्या दिशेने त्यांचे विचारचक्र सुरू झाले. हा अन्याय दूर करायचा असेल तर समाजमनावर असलेले मानसिक गुलामगिरीचे पिशाच्च हाकलने फारच गरजेचे होते. ही गोष्ट बाबासाहेब जाणून होते. विदेशातील शैक्षणिक काळात त्यांनी अनुभवलेली तेथिल सामाजिक स्थिती. त्यांना भारतीय संस्कृतीतील विषमतावादी समाजरचनेविरोधात विद्रोह करण्यसास प्रेरीत करीत होती. माणसांना किमान माणूस म्हणूनतरी सन्मानाची वागणूक मिळावी हा त्यांचा अट्टाहास होता.

आपल्या समाजाच्या ह्या स्थितीगतीला कारणीभूत हिंदू धर्म आणि ही सनातन संस्कृतीच आहे. हा विचार त्यांचा पक्का झालेला होता आणि ह्या विरोधात त्यांनी विद्रोहाचा पवित्रा घेतलेला होता. या व्यसस्थेत राहून आपल्या समाजाचे हित साधता येणार नाही. हे ते जाणून होते. ह्या बाबत त्यांच्या डोक्यात अनेक विचार येत होते.

बाबासाहेबांच्या विचारांवर कॉर्ल मॉर्क्सच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कारण मार्क्स हा सुद्धा श्रमजीवी लोकांच्या राज्याचे स्वप्न बघत होता साम्यवाद आणू पाहत होता आणि बाबासाहेबही श्रमजीवींचेच प्रतिनिधित्व करीत होते. हक्काची लढाई लढाताना मार्क्स धर्माला समाज जीवनातून बाद करतो. मानवाला सुखसाधनांची निर्मिती साधत असताना धर्माची आवश्यकता नाही. त्यामुळे मानवाने 'निधर्मी' बनावे असे मार्क्सचे विचार होते. परंतु मानवातील समाजमनाच्या संवर्धनासाठी धर्म आवश्यक असल्याचे बाबासाहेबांचे मत आहे. याचे कारण कदाचित बाबासाहेबांनी बालपणी आपल्या घरात अनुभवलेले संस्कारही असावेत. परंतु मानवी मनाच्या विकासात धर्माची भूमिका त्यांना महत्त्वाची वाटते. या त्यांच्या विचाराची दुसरी बाजूपण असू शकेलकी त्यांच्या सारखा बुद्धिवादी माणूस विचारांच्या भरवशावर आपले जीवन समृद्ध करू शकेल पण बहुसंख्य असलेला त्यांचा पददलित समाज, अज्ञानी समाज ह्या समाजातील प्रत्येक व्यक्ती शिक्षण आणि विचाराने

आपला विकास साधू शकणार नाही. हे सुद्धा त्यांच्यासारखा द्रष्टा माणूस जाणून होता. सामान्य माणसाला धर्माच्या नावाने सांगितलेले तत्वज्ञान लवकर पचनी पडते. शेवटी धर्म ही अफूची गोळी आहे. असा उल्लेख केवळ नाममात्र नाही. त्यात बरीच व्यावहारिक सत्यता आढळून येते. याच साठी त्यांना गवसलेले यशस्वी जीवनाचे आणि जीवनसाफल्याचे तत्वज्ञान धर्माच्या अंगाने मांडण्याचा विचार त्यांनी केला असावा.

मानवी दु:खाचे मूळ शोधण्यासाठी सिद्धार्थ गौतमाने ६—७ वर्ष अखंड तपोवास केला. वडाच्या झाडाखाली ४९ दिवसांचा कडकडीत उपवास केला. हाडांच्या काड्या झाल्या. शरीर अस्थिपंजर झाले. सिद्धार्थ मृतावस्थेला पोहचला. परंतु त्याचे प्रश्न सुटलेले नव्हते. संसारी मानवाच्या दु:खाचे कारण त्याला सापडले नव्हते. शेवटी गया येथे पिंपळाच्या झाडाखाली सलग चार आठवडे एकाग्र, एकसंघ आणि चिकित्सक चिंतनातून त्यांचे मन प्रकाशाने उजाळून निघाले. या चिंतनातून मानवी दु:खाचे विश्लेषण सिद्धार्थाला गवसले आणि सिद्धार्थ बुद्ध झाला.

मानवाच्या सामान्य दु:खाचे विश्लेषण करणारा बुद्ध जगप्रशिद्ध झाला तर अनादी काळापासून एका विशिष्ट प्रकारच्या अमानवीय दु:खांच्या खोल गर्तेत बुडालेल्या समाजाला शिक्षण आणि विचारांचे जालीम औषध देऊन या पिडीत पिढ्यांचा हमखास उद्धार करणारे बाबासाहेब त्या बुद्धापेक्षाही अधिक सरस नाहीत का? बुद्धाला अपेक्षीत असलेल्या दु:खांचा पोत हा वेगळा होता. तो सर्व सामान्य होता. परंतु दलितांच्या दु:खांचा पोत हा आत्यंतिक अमानविय होता. तो सामान्य पातळीच्या कितीतरी पलिकडचा आणि मानवतेला काळीमा फासणारा होता. बुद्धाने सामान्य माणसाच्याउद्धाराचा मार्ग सांगितला तर बाबासाहेबांनी ज्यांच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा प्रश्न आवासून उभा होता. त्यांचेसाठी उद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला. असा विचार दिला की, ज्यातून अखिल मानवतेचा उद्धार सहज होईल. अनेक पिढ्यांना तारूण नेण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारांत आहे. मानवाच्या नैतिक शुद्धिकरणाची ताकद बुद्धाच्या विचारात असले तरी पददलितांच्या उद्धाराचे सामर्थ्य बाबासाहेबांच्या तत्वज्ञानात आहे. त्यांच्या द्रष्टया विचारांत आहे. एखादया जादूच्या कांडीप्रमाणे बाबासाहेबांनी आपल्या विचारांनी हजानो पीढ्यांपासून खितपत पडलेल्या पिडीतांचा उद्धार केला. ही ताकद बाबासाहेबांची आहे. बुद्धाने जगाला शांतीचा मार्ग दिला तर बाबासाहेबांनी जगभरतील शोषितांना मुक्तीचा मार्ग दिला आणिमुक्ती ही शांतीपेक्षा खचीत श्रेष्ठ असते. बुद्धाने सांगितलेल्या मार्गाने किती लोकांना वास्तवात शांती आणि सुख मिळविता आले सांगणे कठीण आहे. परंतु बाबासाहेबांच्या विचारांनी पीढ्यान् पीढ्यांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य, ते बळ शोषितांच्या पंखांत भरले आहे. हे सा—यास जगाने अनुभवले. बाबासाहेबांना त्यांच्या विकसित जीवनाला पूर्णत्व देण्यासाठी बौद्ध विचारांची निकड भासली. सामान्य माणसालाही त्यांच्या जीवनशुद्धीसाठी या विचारांची निकड आहे. परंतु शोषित —पिडीत समाजाला बाबासाहेब नावाच्या वडवानलाचीच निकड अधिक आहे. हे आवर्जून सांगितले पाहिजे.

बौद्ध धम्म हा साधारणत: तीन हजार वर्षांपूर्वीचा विचार आहे. सम्राट अशोकाने ह्या विचारांचा प्रचार प्रसार केला ती परिस्थिती विचारात घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. ती स्थिती युद्धजन्य अशी होती. लहान—लहान राज्य आपसात भांडून रक्तपात घडविण्यात मशगूल झाली होती. तत्कालीन परिस्थितीत वर्णवादापेक्षा

राज्यवाद, साम्राज्यवाद अधिक प्रभावी होता. शस्त्राच्या बळावर आणि तलवारीच्या धारेवर सामान्य माणसांचे रक्त सांडविले जायचे. हा रक्तपात थांबावा यासाठी अशोकाने सारे प्रयत्न केले. बौद्धाने त्याच्या जीवनाचे जे चिंतन मांडले त्या चिंतनाच्या आधीची म्हणजे बुद्धाच्या समकालीन स्थिती आणि त्यावरील उपाय हे समजून घेतले पाहिजे.

वयाच्या २८व्या वर्षी सिद्धार्थाच्या जीवनात पेच प्रसंग निर्माण झाला. शाक्यसंघ आणि कोलियांमध्ये रोहिणी नदीच्या पाण्यावरून वाद निर्माण झाला. यावर उपाय म्हणून युद्धाचा निर्णय घेण्यात आला. जो शांतीप्रिय सिद्धार्थाला अमान्य होता. यासाठी सिद्धार्थाने राजाचा विरोध केला. सैन्यभरतीत अनेक अडथळे निर्माण केले. आणि याची शिक्षा म्हणून सिद्धार्थाला परिव्राजक स्वीकारून संसाराचा त्याग करावा लागला. पुढे मनुष्य युद्धास का प्रवृत्त होतो? त्याच्या दु:खांची कारणे काय? हयाचा शोध घेण्यासाठी सिद्धार्थाने सारे प्रयत्न केले. परंतु शेवटी वैचारिक चिंतनातूनच त्यांना मानवी दु:खाचे विश्लेषण करता आले आणि मानवाला सत्मार्गाने चालून त्याला त्याचे आणि त्याच्या अवतीभवतीच्या जीवसृष्टीचेही कल्याण करता येते. हा विचार पुढे आला.

बाबासाहेबांनी त्यांच्या आयुष्यभर जो संघर्ष केला. त्या संघर्षाचा पट या परिस्थितीपेक्षा वेगळा आहे. 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मूलगामी विचार बाबासाहेबांनी दिला. आणि हयाच विचारांनी दलित–वंचितांचा उद्धार झाला. बाबासाहेबांचा 'संघर्ष' आणि बुद्धांची 'शांती' हे दोन्ही विचार परस्पर विरोधी वाटतात. हे दोन्ही महामानव ज्या काळात आणि ज्या परिस्थितीत लढलेत. तो काळ आणि परिस्थिती एकमेकांहून मूलत: भिन्न आहे. दोघेही मानवहीतासाठी झटले असले तरी या संघर्षात बाबासाहेब हे श्रेष्ठ ठरतात. असे असले तरी प्रज्ञावानबाबासाहेबांनी बुद्धधम्माचा मार्ग का अनुसरला याबाबत डॉ.यशवंत मनोहर म्हणतात, ''धम्माची नीती ऐहिक आहे. ती माणसामाणसातील नाती अधिक विशुद्ध, अधिक बंधुतापूर्ण करणारी नीती आहे. माणसांमधील माणुसकीची प्रतिष्ठा जपणारी ही नीती आहे. ही नीती जाती, वर्ण असे कोणतेही भेद माणसांमध्ये करीत नाही. ही नीती माणसाला कोणतीही जात मानत नाही. वर्ण मानत नाही.ही नीती माणसाला माणूस माणते. ही नीती स्त्रिला स्त्री म्हणून पुरुषापेक्षा दुय्यम मानीत नाही. ही नीती देशातील सर्वच उपेक्षितांना सामाजिक न्याय देईल असे बाबासाहेबांना वाटले. म्हणून बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला.'' बुद्धांचा समतावाद समाजात निर्माण करायचा होता हे यातून स्पष्ट होते.

बाबासाहेबांच्या जीवनात बुद्धाला महत्व आहे तसा मार्क्ससुद्धा महत्वाचा आहे. मार्क्सचाविचार करताना त्याचा रक्तपात बाबासाहेबांना मान्य नव्हता. तो त्यांनी स्वीकारला नाही. त्याचे 'निधर्मी' विचार बाबासाहेबांना मान्य नव्हते. बाबासाहेबांनी शांतीप्रियअसा बौद्ध धम्म स्वीकारला असला तरी त्यांचा पिंड हा एका क्रांतिकारकाचा होता. हे त्यांच्या जीवन संघर्षातून उघड आहे. धम्म म्हणजे विचार असेल तर शांतिप्रिय विचाराचा स्वीकार करणारा माणूस हा क्रांती करू शकत नाही. संघर्ष करू शकत नाही. कारण सिद्धार्थ संघर्षाच्या, युद्धाच्या विरोधातूनच बौद्ध बनला होता. मग बाबासाहेबांसारखा तार्किक बुद्धिवादी विचारवंत बौद्धाचा स्वीकार करतो याचा अर्थ त्यांनी बौद्धापासून काहीतरी अवश्य स्वीकारले, त्यांना कोणतेतरी तत्त्व आपल्याकडे आकर्षित करीत होते. मग काय असावे ते तत्त्व? तर मानवाच्या नैतिक शुद्धिकरणासाठीत्यांना बुद्धाने दिलेला विचार हा

अधिक खुणावत होता. बाबासाहेब स्वत: चारित्र्य संपन्न असेच होते. त्यांच्या शुद्ध चारित्र्यामुळेच ते त्यांच्या संघर्षाला एका वेगळ्या उंचीपर्यंत नेऊ शकले. जीवहानी न करणे, आर्थिक फसवणूक न करणे, खोटे न बोलणे, कामवासनेवर नियंत्रण करणे, मद्यपान न करणे. हे तत्त्व तर त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग होते. बौद्धाच्या पंचशीलाच्या तत्वाला आपल्या सात्विकचारित्र्याची जोड देऊनहया विचारांना मूर्त रूप देण्याचे सामर्थ्य त्यांनी आपल्या आचरणातून निर्माण केले होते.

बौद्धाचा शुद्ध चारित्र्याचा तसेच मार्क्सचा मजूर कामगार म्हणजे तळागळातील व्यक्तींसाठीचा संघर्षाचा स्वीकार त्यांनी केला आणि या दोन्हींच्या संकरातून त्यांच्या आंबेडकरवादाचा उगम होतो. या आंबेडकरीझमच्या नव्या बाजूने विचार करून एका नव्यातत्वाचा विचार करण्याची गरज आहे. दलित पिडीत समाजाचा उद्धार हा बौद्ध विचाराने नव्हे तर आंबेडकरी विचाराने झाला आहे. दलित समाजाने बाबासाहेबांच्या पावलांवर पाऊल टाकीत बौद्ध धम्माचा स्वीकार केला. परंतु या ऐवजी बाबासाहेबांच्या विचारांना सूत्रबद्ध पद्धतीने मांडणी करून एका नव्या विचाराची मांडणी होणे गरजेचे आहे. जो विचार केवळ भारतवर्षातीलच नव्हे तर जागतिक शोषित समाजाच्या उद्धाराची ताकद ठेवणारा एक नवा दिशादर्शी विचार निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

निष्कर्ष:–

१.बाबासाहेबांचा जीवनसंघर्ष स्वत: एका वेगळ्या विचारतत्वाची ताकदीने मांडणी करतो.
२.अस्पृश्योद्धाराच्या कार्यातून बाबासाहेबांना ह्या नव्या बाजूने विचार करायला वेळ मिळाला नसावा.
३.हिंदूधर्मातील सनातनत्वाच्या निषेधातून त्यांनी धर्मांतर केले.
४.अस्पृश्यांना त्यांच्या हक्कप्राप्तीसाठी शांतीप्रिय बौद्ध धम्मविचारांसोबतच बाबासाहेबांच्या संघर्षशील विचारांची निकड अधिक आहे.
५. बाबासाहेबांना बौद्ध विचारांतून त्यांच्या समाजबांधवांकडून अधिक शुद्ध चारित्र्यांची अपेक्षा आहे.

संदर्भ:–

१. डॉ.बाबासाहेब आंबेकडकर 'बुद्ध की कार्ल मार्क्स'
२. डॉ.यशवंत मनोहर 'धम्मदीक्षेचा सुवर्णमहोत्सव तुम्हाला काय मागतो?'
३. डॉ.यशवंतमनोहर 'रमाई, मी सावित्री, मी यशोधरा!'
४. डॉ.ज्ञानराज का.गायकवाड 'महामानव'

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# आदिवासी समाज आणि जादू

डॉ. आनंद के. भोयर
इतिहास विभाग प्रमुख
भगवंतराव कला महाविद्यालय,
सिरोंचा

**प्रस्तावना :—**

औरंगाबाद जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ १०१०० चौ.की.मी.आहे विस्तार १९°ते २०° उत्तर अक्षांस आणि ७४° ते ७६° रेखांश मध्ये पसरलेला आहे.तसेच पूर्व पश्चिम लांबी २०१ कि.मी. व उत्तर दक्षिण लांबी १६१ कि.मी आहे.समुद्रसपाटी पासून उंची ५२० ते ५७५ मिटर असून उत्तरे कडील काही भागाची उंची सर्वसाधारण ६००ते६७० मिटर आहे. तापमान २७°से.उष्ण व कोरडे असते.हवामानाच्या दृष्टीने तीन विभाग पडतात. जून ते सप्टेंबर मध्ये हवा साधारण उष्ण असली तरी पावसाळयात हावेत गारवा असतो.आक्टोबर ते फेब्रुवारी मध्ये हवा कोरडी व थंड असते.मात्र या कालावधीत दिवसा तापमान वाढते व रात्री थंडीची लाट येते .मार्च ते मे महीन्यात हवामान उष्ण व कोरडे असते. एकंदरीत विचार करता जिल्हयातील हवामान पिकांसाठी व मानवी आरोग्यासाठी अल्हाददायक आहे. तसेच या जिल्हयात पर्जन्यमान जुन ते सप्टेंबर महिण्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. उर्वरीत महिने मात्र कोरडे असतात.परंतू उन्हाळयात अवकाळी पाऊस देखील पडतो. आज जिल्हयातील पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात उदभवताना दिसत आहे.शेतीसाठी ,पीण्यासाठी ,गुरांसाठी औद्यागिक क्षेत्रासाठी दिवसेंदिवस पाण्याच्या मागणीचे प्रमाण वाढत आहे.कारण वाढती लोकसंख्या व पडणारे वार्षीक पर्जन्यमान यामध्ये दिवसेंदिवस तफावत दिसून येते.कारण काही भागात पाऊस कमी पडतो तर काही भागात जास्त. त्यामुळे औरंगाबाद जिल्हयातील पर्जन्यमानाचा,भूमीउपयोजनावरील परिणामाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**उद्धिष्टये** : १) जिल्हयातील पर्जन्यमानाचा अभ्यास करणे.

२) पर्जन्यमान व भूमिउपयोजनाच्या अभ्यासाचा हेतू स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंधामध्ये दुय्यम स्त्रोताचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोग करण्यात आला आहे. संशोधनासाठी सरासरी पर्जन्यमानाच टक्केवारी,सांख्यिकीय साधनाचा वापर,

महाराष्ट्र विकास अहवाल,इंटरनेट इ.चा वापर, केला आहे.

**विषय विवेचन :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये पर्जन्यमानाचा म्हणजेच पडलेल्या पावसाचा उपयोग वेगवेगळया घटकांसाठी होतो.तसेच त्या भागामध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण किती आहे त्याचा उपयोग आपल्याला मानवाच्या विकासासाठी,शेती, उद्योगधंदयासाठी कसा करून घेता येईल.अशा वेगवेगळया घटकांचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला औरंगाबाद जिल्हयातील पर्जन्यमानाचा व भूमिउपयोगाचा अभ्यास करणे. गरजेचे आहे.

**१) शेतीच्या विकासासाठी :**

पर्जन्यमानाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पिक उत्पादनासाठी किंवा शेतीच्या विकासासाठी आवश्यक लागणारे पर्जन्यमान व सध्या पडणारा पाऊस यांचा अभ्यास करून आपल्याला शेती उत्पादन घ्यावे लागेल तसेच पिके लागवडीच्या पद्धतीत बदल करून अन्नधान्ययात होणारी घट थांबवण्यासाठी अभ्यास करणे गरजेचे आहे.

**२) पाणीप्रश्न सोडवण्यासाठी :**

एकंदरीत विचार करता जिल्हयाची लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे.आणि या वाढत्या लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे.तसेच जिल्हयातील वाढते औद्योगिकरण त्यासाठी लागणारे पाणी त्यामुळे याविषयीचे विवेचन करणे गरजेचे आहे.

**३) भूजल पातळी वाढवण्यासाठी :**

पाऊस पडल्यानंतर पडलेले पाणी नदी व नाल्याद्वारे वाहून जाते.तर ते पाणी वाहुन न जाता जमीनीत कसे मुरेल व जिल्हयाची भूजल पातळीत कशी वाढ होईल त्यासाठी जलसंधारण योजना राबवणे यासाठी अभ्यास करावा लागेल.

**४) भविष्यकालीन जलनियोजन :**

पर्जन्यमानाचा अभ्यास केल्यानंतर जिल्हयात सरासरी पर्जन्यमानाची आवश्यक्ता किती आहे. आणि प्रत्यक्षात किती पडतो.भविष्यात पर्जन्याची स्थीती काय असेल.यानूसार जल नियोजनासाठी विविध पाणी आडवा पाणी जिरवा ,वृक्षसंवर्धन ,पाणलोट प्रकल्प इ.योजना राबविणे तसेच या जिल्हयातील जनतेला पाण्याचे महत्व समजून सांगणे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

३) भूमिउपयोजनाचा आढावा घेणे :

जिल्हयातील भूमि उपयोजन कशाप्रकारचे आहे.पिकाखालील क्षेत्र लागवडी खालील क्षेत्र, वनाखालील क्षेत्र महाराष्ट्रात आणी जिल्हयात त्याचे प्रमाण किती आहे. या घटकांचे विवेचन करण्यासाठी औरंगाबाद जिल्हयातील पर्जन्ययाच्या भूमिउपयोजनावरील परीणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

तक्ता क्रमांक – १.

औरंगाबाद जिल्हयातील सरासरी पर्जन्यमान (२००६ ते २०११) मि.मी मध्ये.

| अ.क्र. | जिल्हा | वर्षे | सरासरी पर्जन्य मि.मी | सरासरी कमी पर्जन्य मि.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | २००६ | ६७५.४६ | — |
| २. | | २००७ | ५८३.८९ | ८५.५७ |
| ३. | | २००८ | ६४३.५८ | + ५९.६९ |
| ४. | | २००९ | ६४३.५८ | ०००.०० |
| ५. | | २०१० | ५८९.२० | + १७.२० |
| ६. | | २०११ | ५८९.२० | +१७.२० |
| | एकुण सरासरी | | ६१७.९५मि.मी | |

स्त्रोत – १) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन,औरंगाबाद,२००९,१०,११,१२, पृ.क्र.०२,१९.

२) **Aurangabad District Profile-htm-2014**

वरील तक्ता क्रमांक १ मध्ये दाखवलयाप्रमाणे औरंगाबाद जिल्हयातील सरासरी पर्जन्यमानाचा अभ्यास केला असता सलग दोन वर्षे पाऊस कमी पडतो.व त्यानंतर एक वर्षे पाऊस बऱ्यापैकी पडतो. तक्ता १मध्ये दाखवल्याप्रमाणे जिल्हयातील वार्षीक पर्जन्य ६१७.९५मि.मी सरासरी आहे. तर वर्षानिहाय विचार केला असता २००६,२००८,२००९ मध्ये पावसाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.तर २००७,२०१०,२०११ मध्ये –७१.५८ मि.मी तर ११ मध्ये +१७.२० मि.मी.वाढ झाली.यावरून आपल्या असे लक्षात येते की ,जिल्हयातील पर्जन्यमानाची स्थती फारसी चांगली नाही तर दुसरीकडे वाढती लो.संख्या व लागणारे पाणी याचा विचार केला असता आपल्याला पडलेल्या पावसाचे नियोजन पूर्वक वापर करणे गरजेचे आहे.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

तक्ता क्र.—२.

औरंगाबाद जिल्हातील भुमिउपयोजनातील पिकाखालील क्षेत्र.(२००६—२०११)

| | पिकाखालील क्षेत्र | हजार हेक्टर | . जिल्हा | महाराष्ट्र राज्य |
|---|---|---|---|---|
| १. | पिकाखालील निव्वळ पेरणी क्षेत्र | | ७२१ | १७४०१ |
| २. | एकुण क्षेत्र | —— | ८६० | ५२११ |
| ३. | एकुण पिकाखालील क्षेत्र | —— | ८९८ | २२६१२ |
| १. | तृणधान्ये ,ज्वारी ,बाजरी ,मका, | —— | ३४७ | ८९९० |
| २. | कडधान्ये ,मटकी,हारभरा,नाचणी | —— | ७७ | ४०३८ |
| ३. | तेलबिया,शेंगदाणे,करडी,सोयाबीन | —— | १५ | ३६२४ |
| ४. | उस | —— | १७ | ९६५ |
| ५. | कापूस | —— | ३७९ | ३९४२ |

स्त्रोत : जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन औरंगाबाद.२००६ —२०११

१. पावसाच्या लहरीपनामूळे उसाचे क्षेत्र घटले तर कापसाच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली.
२. निवळ ओलीताखालील क्षेत्राचा विचार करता राज्याच्या तुलनेत अत्याल्प ७२१ हजार हेक्टर आहे.तेच राज्याचे १७४०१ हजार हेक्टर आहे.
३. एकुण ओलीताखालील क्षेत्राचा विचार करता जिल्हयात ८६० हजार हेक्टर क्षेत्र आहे.
४. फळबाग शेतीकडे देखील शेतकऱ्यांचा कल कमी झाला आहे.पर्जन्यमान ,बीयाने ,रासायनिक खते,जमिनीचा कस इ घटकाचा परिणाम भूमिउपयोजनावर होतो.
५. आधुनिक पद्धतीची शेती कमी होत असल्याने पिक उत्पादनात घट होत असल्याचे दिसते. परिणामत:शेतकरी कर्जबाजारी होताना दिसतो.
६. गोदावरी नदीच्या खोऱ्यात मैदानी भागात थोडया प्रमाणात काही मुख्य पिके घेतली जातात. उदा.उस ,कापुस,फळबाग,ज्वारी,मोसंबी,पालेभाज्या,सारखी नगदी पिके घेतली जातात.
७. पावसाचा विचार करून कमी पर्जन्यमान होत असल्याने शेतकरी जे पिक कमी पावसाच्या पाण्यावर व लवकर येतात असी पिके घेतात.उदा: मका,सोयाबीन,बाजरी.
८. एकुण उत्पादनाचा विचार करता जिल्हयात कापसाचे सरासरी उत्पादन सर्वात जास्त आहे. त्यापाठोपाठ तृनधान्ये ज्वारी,बाजरी,मका याचे उत्पादन वाढताना दिसते.

सारांश :

औरंगाबाद जिल्हयातील पर्जन्यमानामुळे भुमिउपयोजनात असे दिसून येते की,जिल्हयात सरासरी पर्जन्यमान आतापर्यंत ६७५.२ मी.मी जास्तीत जास्त पावसाची नोंद झाली आहे. व कमीत कमी पर्जन्यमान ५७२.०० मी.मी आहे.परंतु प्रत्यक्षात जिल्हयात ६१७.८३ मी.मी सरासरी पाऊस पडतो. म्हणजेच प्रत्यक्ष ६१.७८ सें.मी आहे. जिल्हयात बराच भाग दुष्काळी परिस्थिती पहावयास मिळते त्यामूळे. जिल्हयात पाण्याची टंचाई जानवताना दिसून येते.त्यासाठी आपल्याला पडणाऱ्या पावसाचे नियोजन करणे गरजेचे आहे. भूजल पातळी वाढवणे ,शेतीसाठी मयार्दित पाण्याचा वापर करणे. भविष्यात पर्जन्यमान वाढविण्यासाठी वृक्षारोपन करणे व जंगलतोड थांबवणे ,सिमेंटीकरण थांबवणे ,प्रदुषण व उघोग धंदे यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे जेणेकरून जिल्हयातील दुष्काळी

स्थितीवर मात कराता येईल व शेती उत्पादन वाढवता येईल व पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवता येईल.

संदर्भसुची : १.पर्यावरण भुगोल – डॉ.विठठल धारपूरे

२. महाराष्ट्र भूगोल – डॉ. सुरेश फुले.

३. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन औरंगाबाद. २०११–१२४.

४.दैनिक सकाळ ॲग्रोवन २८/०२/२०१३५.

५.महाराष्ट्राचा भुगोल – डॉ. पांडूरंग दृकेचे.कैलास पब्लिकेशन

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

डॉ. विद्याधर बन्सोड
मराठी विभागप्रमुख
सरदार पटेल महाविद्यालय
चंद्रपूर – ४४२४०२
Mob. 9421717295

सारांश :—

वर्तमान काळातील भारतीय विद्यापीठांचा दर्जा वाढवायचा असेल तर जागतिक दर्जाचे सुसज्ज ग्रंथालय आपल्याकडे असले पाहिजे. जसे प्राचीन काळातील नालंदा विद्यापीठात नालंदा विद्यापीठात होते. आपला दर्जा सांभाळण्यासाठी विद्यापीठात दर्जदार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा. विद्यापीठातील अभ्यासक्रम जगातील विद्यार्थ्यांना आपल्याकडे आकर्षित करणारा असावा. विद्यार्थ्यांचे केवळ बौध्दिक चातुर्य न पाहता त्याच्यावरचे नैतिक संस्कार महत्त्वाचे मानले जावे. त्याच्या सर्व गुणांच्या विकासाचा विचार व्हावा. जगातील विविध भाषांच्या अध्ययनाचे केंद्रे विद्यापीठात निर्माण व्हावे. दर्जेदार ग्रंथांची निर्मिती अध्यापकांनी करावी व त्यांच्या ग्रंथानिर्मितीला विद्यापीठाने प्रोत्साहन द्यावे. अध्यापनाच्या पध्दतीत वादविवाद, चर्चा, परिसंवाद यांचे महत्त्व वाढविण्यात यावे. त्याचेही गुणांकन व्हावे. विद्यापीठातील शिक्षणाने तयार झालेले विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या कलांमध्ये निपूण निर्माण व्हावीत. व त्या विद्यापीठाच्या एकंदरीतच सर्वांगीण विकासात त्यांचे प्रतिबिंब दिसावे. अव्वल दर्जाचे संशोधक, कलावंत, प्रतिभावंत, नैतिक दृष्टया प्रबळ विद्यार्थी विद्यापीठीय शिक्षणाद्वारे निर्माण झाले तर जगातील अन्य देशातील विद्यार्थी आपल्या देशातील विद्यापीठीय शिक्षणाकडे आकृष्ट होतील. प्राचीन काळातील नालंदा विद्यापीठाचे आदर्श सर्वांना आपल्या डोळयापुढे ठेवावे लागेल. तरच जगाला परत उच्चशिक्षणासाठी आपल्या देशाकडे वळविता येईल व आपल्या देशातील विद्यार्थ्यांना आपल्या देशातच उच्च दर्जाचे शिक्षण प्राप्त होईल. नामांकित विद्यापीठात शिक्षण घेतल्याचा अभिमान वाटेल.

बीज शब्द :—

जागतिक दर्जा, ग्रंथालय, नालंदा विद्यापीठ, वर्तमान भारतीय विद्यापीठे.

प्रस्तावना : सध्याच्या काळातील भारतीय विद्यापीठांचा दर्जा जागतिक विद्यापीठांच्या तुलनेत असमाधानकारक आहे. परंतु प्राचीन भारतीय नालंदा विद्यापीठ जागतिक दर्जाचे होते. त्याची काय वैशिष्टये होती की जी आपल्या आजच्या भारतीय विद्यापीठात नाहीत ते पाहू या.

## आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नालंदा विद्यापीठ :—

तक्षशिला व नालंदा विद्यापीठाच्या पूर्वी तेव्हाच्या हिंदुस्थानात जे शिक्षण होते ते वैदिक शिक्षण पध्दतीचे होते. त्यात शिक्षणाची दारे केवळ उच्चवर्णीयांसाठीच खुली होती. शुद्र व स्त्रिया या सर्वात विशाल समुदायाला त्यात मुळीच स्थान नव्हते. उत्तर वैदिक काळात स्त्रियांना गुरूकुलात जाऊन शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारण्यात आला. परिणामस्वरूप शूद्रांची व स्त्रियांची बौध्दिक प्रगती खुंटली आणि त्यांची शैक्षणिक अधोगती होऊन हा वर्ग कायमचा अज्ञानाच्या अंधकारात फेकला गेला.

डॉ. राधाकुमुद मुखर्जी म्हणतात, 'ब्राह्मणी शिक्षण पध्दतीत कौटुंबिक वातावरणाची आवश्यकता असल्यामुळे गुरूकुल विशाल होऊन त्याचे विद्यापीठात रूपांतर झाले नाही. परंतु बौध्द शिक्षणास प्रारंभ होताच

हे चित्र बदलले आणि विशाल विद्यापीठाची स्थापना झाली. 'भारतातील संघटित शिक्षण संस्थांच्या उदयाबद्दल चार्ल्स इलियट म्हणतात, 'बौध्द धर्मामुळेच भारतात धार्मिक शिक्षण संस्था आढळतात.'[२] (तत्रैव पृष्ठ २१२) नालंदाला प्राचीन काळापासून अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते.

नालंदा विद्यापीठाची कीर्ती दूरवर पसरल्यामुळे येथे भारतातील विभिन्न प्रांतातून तसेच चीन, कोरीया, तिबेट या देशांतून विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येत होते. वर्तमान काळात भारतात असे किती विद्यापीठे असतील की जेथे विदेशी विद्यार्थी शिक्षण घ्यायला येत असतील? आपल्याच देशातील विद्यार्थी पाश्चात्य देशात शिक्षण घेण्यासाठी धात घेताना दिसतात. नालंदा विद्यापीठात प्रवेश प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रंचड गर्दी होत असे. या विद्यापीठात कोणालाही सहज प्रवेश मिळत नसे. विद्यार्थ्यांना यासाठी प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागे. ही प्रवेशपरीक्षा द्वारपंडित घेत असत. हे विविध शास्त्रांतील विद्वान असत. ही परीक्षा अत्यंत कठीण असली तरी सर्वसमावेशक होती. हयात केवळ २० ते ३० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होत असत. हयावरून आपणास या विद्यापीठाचा दर्जा व प्रतिष्ठेची कल्पना येते. अशाप्रकारे आधुनिक काळात होणाऱ्या प्रवेश परीक्षेची सुरूवात ही नालंदा विद्यापीठाची महत्त्वपूर्ण देणगी आहे. जेथे सर्व जातींच्या, रंगांच्या, वंशांच्या आणि देशांच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे. त्या विद्यार्थ्यांना विषय निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या मर्जीनुसार शिक्षण दिले जात असे. ही एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक क्रांती होती. ज्याचा समस्त भारतीय समाजावर निश्चितच प्रभाव पडला. नालंदा विद्यापीठात नि:शुल्क शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक शुल्क वसूल केले जात नव्हते. विद्यार्थ्यांसाठी मोफत निवासाची व भोजनाची सोय करण्यात आली होती. इतर धर्मीय विद्यार्थ्यांना सुध्दा नि:शुल्क निवासाची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या विद्यापीठात चीन, कोरीया, तिबेट, श्रीलंका व मंगोलिया या देशातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत होते. नालंदातील विद्यार्थी समाज एक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी समाज बनला होता. आधुनिक शैक्षणिक संकल्पनेप्रमाणेच या विद्यापीठाच्या परिसरातच विद्यार्थी व अध्यापकांच्या निवासाची व भोजनाची सोय करण्यात आली होती.

**द्वारपंडित** :– 'नालंदा विद्यापीठात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी द्वारपंडिताची नियुक्ती करण्यात आली होती. हे द्वारपंडित धार्मिक वादविवाद व शास्त्रर्थात निपुण असत. जे प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना करीत प्रश्न विचारण्यासाठी सदैव तयार असत. अनेक विद्यार्थी या द्वारपंडिताच्या प्रश्नांची उत्तरे न देऊ शकल्यामुळे परत जात. जे विद्यार्थी जुन्या व नव्या शास्त्रात प्रविण असत, तेच उत्तीर्ण होत असत. ही प्रवेश परीक्षा इतकी कठीण असे की, 'दहापैकी दोन किंवा तीन विद्यार्थी उत्तीर्ण होत असत.'[३] यावरून नालंदा विद्यापीठात कोणत्या दर्जाचे विद्यार्थी प्रवेशित होत असत याची कल्पना येते.

**प्रवेशाचे वय** :– सुप्रसिध्द चिनी प्रवासी इत्सिंग म्हणतो,' विद्यार्थी वयाच्या १५ व्या वर्षी वृत्ती सूत्राचे अध्ययन करीत असत. ते वयाच्या २० व्या वर्षापर्यंत चालत असे. यांनतर तो विद्यार्थी नालंदा आणि वल्लभीसारख्या विद्यापीठात दोन किंवा तीन वर्षापर्यंत तत्त्वज्ञानाचे अध्ययन करीत असे[४] यावरून नालंदातील प्रवेशाचे वय साधारणत: २० वर्षे असले पाहिजे. आज आपले भारतीय विद्यार्थी वयाच्या १८ व्या वर्षी, १२ वी

ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदवी शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरतात. परंतु अलीकडे पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान, इंजिनिअरींग शाखेत सामान्य कुवतीच्या विद्यार्थ्यांना सुध्दा प्रवेश मिळतो.

नालंदा विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा अतिशय उच्च होता. म्हणून संपूर्ण नालंदातील विद्यार्थ्यांकडे आदर्श विद्यार्थी म्हणून पाहिले जात होते. येथील विद्यार्थी भिक्खूसंघाच्या नियमांचे व अनुशासनाचे कठोरपणे पालन करीत असत. येथे राहणारे विद्वान इतके थोर व प्रगल्भ असत की नालंदाच्या ७०० वर्षांच्या इतिहासात या नियमांचा एकानेही भंग केला नाही.

नालंदातील शिक्षणाविषयी प्रसिध्द चिनी प्रवासी हयु एन त्संग म्हणतो, 'येथे हजारो विद्यार्थी होते. इ.स. च्या ७ व्या शतकात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांची वास्तविक संख्या ५००० च्या जवळपास होती. येथे १५१० प्राध्यापक होते. यांपैकी १००० प्राध्यापक २० ग्रंथांचे स्पष्टीकरण करू शकत. ५०० प्राध्यापक ३० ग्रंथांचे स्पष्टीकरण करू शकत आणि १० प्राध्यापक ५० ग्रंथांचे स्पष्टीकरण करू शकत होते. यावरून साधारणत: शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे जातीने लक्ष देणे सहज शक्य होते. विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या या संख्येवरून या विद्यापीठाच्या भव्यतेची आपणास सहज कल्पना करता येते.'[५]

आपल्या वर्तमान भारतीय विद्यापीठांची तुलना केली तर विद्यार्थ्यांना शिकवणारे प्राध्यापक आपणास दिसतात पण प्रती विद्यार्थ्यांमागे प्राध्यापकांची संख्या फार कमी असल्याचे आपणास दिसून येते.

**विद्यापीठाचा अभ्यासक्रम** :– नालंदा विद्यापीठाचा अभ्यासक्रम अत्यंत व्यापक आणि उदार होता. हयुएनत्संग म्हणतो, 'येथे प्रवेश प्राप्त करण्यासाठी जुन्या व नवीन ग्रंथांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक होते. त्यात वेद, उपनिषद, सांख्य, वैशेषिक, न्याय, महायान व हिनयान ग्रंथांचा समावेश होता. हयुएनत्संग यांनी स्वत: नालंदात योगाचार, न्याय, अनुशासनशास्त्र, शब्दविद्या, कोष आणि विभाषा या महायान ग्रंथांचे शीलभद्र व इतर विद्वानांकडून ज्ञान प्राप्त केले.

'तर्कशास्त्राला संस्कृतमध्ये हेतूविद्या म्हणतात. बौध्द, जैन, सांख्य आणि इतर संप्रदायांचे स्वत:चे तर्कशास्त्र होते. या सर्वांचे अध्ययन विद्यार्थ्यांना करावे लागे.[६]

भाषाशिक्षण :– नालंदा विद्यापीठात संस्कृत ग्रंथांची प्रचंड प्रमाणात निर्मिती झाल्याचे दिसून येते. फाहीयान हा चिनी प्रवासी तीन वर्षे पाटलीपुत्र विहारात राहून संस्कृत भाषा शिकला आणि सोबत अनेक ग्रंथ घेऊन गेला. इसवी सनाच्या सहाव्या शतकात आलेला चिनी प्रवासी हयु एनत्संग याने

अनेक संस्कृत ग्रंथ आपल्यासोबत नेले. इत्सिंग या चिनी प्रवाश्याने आपल्या सोबत संस्कृत भाषेतील ४०० ग्रंथ नेले होते. त्यापैकी ५६ ग्रंथांचा त्याने स्वत: चिनीभाषेत संस्कृत भाषेतील गंथाचे भाषांतर केले. सुमात्रांच्या भिक्खूने नालंदा विद्यापीठात संस्कृत ग्रंथांची प्रत तयार केली. नालंदा हे संस्कृत ग्रंथांच्या भाषांतराचे मुख्य केंद्र होते.

'नालंदातील विद्वानांनी संस्कृत व्याकरणावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. धर्मपालाने महाचार्य चंद्रगोमीनच्या व्याकरणावर 'वर्णसूत्रवृत्ती नाम' ही टीका हिहिली. त्याचा चंद्रव्याकरण हा व्याकरणावरील ग्रंथ काश्मीर, नेपाळ, तिबेट आणि श्रीलंकेत फार लोकप्रिय होता.'[७]

सध्याच्या भारतीय विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे तर त्यांचे लक्ष आणि आदर्श पाश्चात्य विद्यापीठे आहेत परंतु आपला देशात अशी विश्वप्रसिध्द विद्यापीठे होती, तशी विद्यापीठे आपण निर्माण करून जागतिक शिक्षणाचा प्रवाह आपल्या देशाकडे वळवावा अशी वृत्ती दिसत नाही. संशोधनवृत्तीचा श्रेष्ठपणा दिसत नाही. आता विदेशातील लोक भारतीय विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी धडपडतं नाही तर भारतीय विद्यार्थी विदेशी विद्यापीठात शिकण्यात धन्यता मानतात.

आपल्याला विद्यापीठीय स्वरावर दर्जेदार, विश्वातील लोकांना आकृष्ट करावे अशा ग्रंथांची निर्मिती करावी लागेल व असे ग्रंथ लिहिणाऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा गौरव वाढवावा लागेल.

**व्यवहारोपयोगी शिक्षण** :– आपल्या प्राचीन नालंदा विद्यापीठात 'चिकित्साविद्या' अतिशय लोकप्रिय व महत्त्वपूर्ण विषय होता. तिथे कला व शिल्पकला शिकवल्या जात होत्या, क्षत्रिय विद्यार्थ्यांना धनुर्विद्या शिकविली जात असे. राज्यकारभारसंबंधीही शिक्षण दिले जात असे नालंदात पालशैलीतील मूर्ती व शिल्प सर्वाधिक आढळल्यामुळे येथील शैलीस पालशैली म्हटले जाते. परंतु डॉ. सांकलियाच्या मते ही नालंदाशैली आहे. येथील शिल्पकार अत्यंत निष्णात होते.[८] नालंदातील उत्खननात एकही चित्र आढळले नाही. ते जळून नष्ट झाले परंतु येथील चित्रे नेपाळ आणि तिबेटमध्ये प्रज्ञा–पारमिताच्या हस्तलिखित प्रती आहेत. 'धीमन' आणि 'बितपालो' हे नालंदातील सुप्रसिध्द मूर्तीकार व चित्रकार होते आणि येथील विद्यार्थ्यांना या कलांचे शिक्षण देत होते. शिल्पकला शिलालेखातील उल्लेखाप्रमाणे नालंदातील भिक्खूंही मूर्तिकला व इतर ललित कलेसाठी विख्यात होते. स्थापत्याच्या दृष्टीने इ.स. ७ व्या शतकातील नालंदा विद्यापीठ हे भारतातील बहुतेक सर्वात मोठे आणि सुंदर विहार होते, स्तुपांच्या विटांची जुडाई इतक्या सुंदर रीतीने केली होती की, त्यांचे जोडही दिसत नाही. विहारांच्या भिंतीची जाडीही असाधारण होती, यावरून वास्तुशिल्पकाराच्या काटकसरीची आणि सौंदर्य रसिकतेची जाणीव होते. ' नालंदाच्या कलेचा कालांतराने इतका विकास घडून आला की, यांचा प्रभाव कंबोडिया, चीन, उत्तर नेपाळ आणि तिबेटच्या कलेवर पडला.'[९]

वर्तमान काळातील भारतातील सर्व विद्यापीठांच्या (ब्रिटीश काळातील इमारती वगळून) अशा कोणत्या आणि कुठल्याच इमारती उच्च शिल्पकलेचा नमुना नाहीत. की ज्यावर भारतीय इंजिनिअरींगच्या उत्कृष्टतेचा प्रभाव पडून, जगातील अन्य देशातील वास्तुकारांना ज्याचा मोह व्हावा.

आजच्या आपल्या विद्यापीठांच्या इमारती पाश्चात्यांचे अनुकरण करीत तरी बनविल्या जातात किंवा अल्प शिक्षित ठेकेदार, अडाणी बेलदारांकडून बनवून घेतात. आज आपण शिल्पकला हरवून बसले आहोत.

**ग्रंथनिर्मिती** :– 'नालंदा विद्यापीठात काही असे ग्रंथ होते की ज्यांची लोकप्रियता प्रचंड होती. नालंदा विद्यापीठात अनेक विद्यार्थी व विद्वान या ग्रंथाचे नियमित अध्ययन करीत असत. राहुलमित्र 'रत्नकुटसूत्रा' चे

दररोज अध्ययन करीत होता. इत्सिंगचा गुरू 'हुई–शी' हयाने 'सद्धर्मपुंडरिकांचे' साठ वर्षापर्यंत दररोज अध्ययन केले होते. 'महाप्रज्ञापारमिता सूत्र' या ग्रंथाची इतकी ख्याती होती की, समतटचा राजा राजभट दररोज या ग्रंथाच्या शंभर श्लोकांचे वाचन करीत होते[१०] वसुबंधुचा 'अभिधर्मकोष', अश्वघोषाचा 'बुध्दचरित', नागार्जुनाचा 'सुहयलेखा' आणि 'जातकमाला' हे दोन्ही ग्रंथ विशेष लोकप्रिय होते. 'मैत्रीचे सूत्र' हा ग्रंथ इतका महत्त्वपूर्ण होता की प्रत्येक भिक्खूला त्याचे अध्ययन करणे अत्यावश्यक होते.

वर्तमान काळातील भारतीय विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या ग्रंथनिर्मितीकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. प्राध्यापक मंडळी ग्रंथनिर्मिती करीत नाहीत असे नाही पण जगातील अभ्यासकांचे लक्ष वेधले जावे त्या दर्जाच्या ग्रंथांची निर्मिती व्हायला पाहिजे. ती ग्रंथ निर्मिती नालंदा विद्यापीठातील ग्रंथनिर्मितीच्या तोडीची नाही. त्या दर्जाची नाही. संशोधनाचा, लेखनाचा दर्जा अत्युच्च असावा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. व प्राध्यापकांना त्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागेल.

**अध्यापनाच्या पध्दती** :– नालंदा विद्यापीठात मौखिक ज्ञानाला प्राधान्य असे. शिक्षण मौखिक परंपरेद्वारे, श्रवण स्मरणाद्वारे होत असे. या विद्यापीठात शास्त्रार्थ किंवा वादविवाद, चर्चेला अतिशय महत्त्व दिले जात असे. तर्कशास्त्र्यांची गरज असे. वादविवादाच्या परिषदा आयोजित केल्या जात असत. हयुएनत्संग म्हणतो की,' विद्यार्थी सकाळपासून रात्रीपावेतो चर्चा करत असत. गुरू विद्यार्थ्यांना धर्म व विनयाचे ज्ञान देत असत. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष दिले जात होते. नालंदातील दिवस रात्रीची तात्विक चर्चा व व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना सूत्रांचा खरा अर्थ समजण्यास मदत मिळत असे. 'याशिवाय विद्यार्थ्यांना सामाजिक घटकांचे, व्यवहाराचे आणि वनस्पतींचे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी देशाटन अत्यावश्यक मानले जात होते. आधुनिक शिक्षण तज्ज्ञांनी या पध्दतीस पर्यटनाद्वारे शिक्षण असे म्हटले आहे.[११]

एकंदरीत विद्यार्थी गुरूला अत्यंत आदर व मान देत असत. आचार्य आपल्या शिष्याच्या नैतिक आचरणाचे निरिक्षण करून त्यांचे दोष त्याच्या निदर्शनास आणून देत असत. शिष्याचे दोष निदर्शनास आल्यास आचार्य त्यास पश्चाताप व निरसन करण्याची संधी देत असत. आचार्य शिष्यावर पुत्रवत प्रेम करीत असे. विद्यार्थ्याच्या योग्यतेनुसार त्याच्या श्रेणी असत. शैक्षणिक श्रेणीप्रमाणे महाविहारात सुविधा प्राप्त होत असत.

नालंदा विहारात कठोर अनुशासन ठेवले जात होते. बुध्दांनी संघात अनुशासन टिकविण्यासाठी जे नियम बनविले होते, त्याच आधारावर अनुशासन टिकविण्याच्याचा प्रयत्न केला जात होता. नालंदातील विद्यार्थ्यांना बौध्दिक, नैतिक व व्यावहारिक शिक्षणाबरोबरच शारिरीक शिक्षण दिले जात होते. विद्यार्थ्यांचे निश्चित असे वेळापत्रक होते.

विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या कालावधीत शारीरिक श्रम करावे लागत. शारीरिक श्रमाशिवाय विद्यार्थ्यांना आध्यात्मिक विकासासाठी प्रयत्न करावा लागे. भिक्खूंशिवाय इतरांना हत्तीविद्या, अश्वविद्या, धनुष्यविद्या, परशुविद्या, धावणे, उत्सोलह, अप्पोठ सांगणे, निब्बुज करणे, मुक्केबाजी, स्त्रियांसोबत नृत्य करणे इत्यादी क्रीडा होत असत.

**निवासस्थान व पदवीदान** :– नालंदा महाविहारात केवळ विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची सोय करण्यात आली नव्हती तर त्यांच्या निवासाची सोय करण्यात आली होती. अध्यापकांसाठी सुध्दा निवासाची सुविधा करण्यात आली होती. आधुनिक काळात शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे पदवी दिली जाते, त्याचप्रमाणे नालंदात परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्याची पध्दत होती. परंतु नालंदाच्या पदवीला खूप महत्त्व होते. असे महत्त्व वर्तमानातील भारतीय विद्यापीठातील पदवीला नाही. नालंदा व तक्षशिला विद्यापीठातील विद्यार्थ्यांला समाजात मान व प्रतिष्ठा होती.

या विद्यापीठातील विद्यार्थ्यांविषयी डॉ. राधाकुमुद मुखर्जी म्हणतात, 'नालंदातील विद्यार्थ्यांत वैचारिक, धार्मिक व सांप्रदायिक विविधता असली तरी त्यांच्यात निर्माण झालेली एकता आश्‍चर्यकारक होती[१२] तेथील लोकशाही व्यवस्था आश्‍चर्यकारक होती.

**ग्रंथालय** :– कुठल्याही विद्यापीठाची शान म्हणजे त्या विद्यापीठाचे ग्रंथालय. ग्रंथालयाशिवाय विद्यापीठ म्हणजे धान्याशिवाय गोदाम. नालंदा विद्यापीठात शेकडो आचार्यांसाठी व हजारो विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज व भव्य ग्रंथालय बांधण्यात आले होते. नालंदा विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या 'रत्नसागर, 'रत्नोदधी' आणि 'रत्नरंजक' हया तीन भव्य इमारती होत्या. यांपैकी 'रत्नसागर', ही इमारत नऊ मजली होती[१३] वर्तमान भारतीय विद्यापीठांच्या ग्रंथागारासंदर्भातील, ५ मार्च २०१५ ला इंटरनेटद्वारे प्राप्त माहिती खालीलप्रमाणे आहे. कलकत्ता येथील विद्यापीठात २ लाख ग्रंथ आहेत. गुवाहटी विद्यापीठाच्या २,५९,४९० ग्रंथसंपदा आहे. मद्रास विद्यापीठात ४८९०० ग्रंथ व २१५८ संदर्भ ग्रंथ आहेत. नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयात ३,९५,२०५ ग्रंथ आहेत. दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू या (JNU) प्रख्यात विद्यापीठात ५ लाख ६८ हजार ग्रंथ आहेत. बनारस हिंदू विद्यापीठाच्या ग्रंथालयात एकूण ९,२५,४२५ ग्रंथ १,५३,८७५ जर्नल्स, ६१० current Journals, १५९२१ पी.एच.डी. शोधप्रबंध, आणि ७२२७ हस्तलिखिते आहेत. या सर्वाच्या तुनलेत मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात सर्वात जास्त ग्रंथ आहेत. एकूण ग्रंथ ६,९९,३२१ पी.एच.डी. प्रबंध आणि डेझर्टेशन २०,०००, पिरीऑडिकल्स १२,०००, हस्तलिखिते १५,००० आहेत[१४]. आपल्या देशातील कोणतेही विद्यापीठ अजून दहा लाख ग्रंथ हा आकडा सुध्दा गाठू शकले नाही. आणि त्या ग्रंथाचे वाचक किती व त्या ग्रंथाचा दर्जा काय ? यावर तर प्रश्न चिन्ह आहे. विद्यापीठाएवढी ग्रंथालयाची इमारत कोणत्याच विद्यापीठाची नाही. नालंदा विद्यापीठाने 'श्रीलंका, नालंदा, ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया, लाओस, जपान, तिबेट, मंगोलिया, नेपाळ, सिक्कीम, भूतान इत्यादी देशांत भारतीय संस्कृती पोहचविली. भारतीय ग्रंथ पोहचविले.

**वर्तमान जागतिक विद्यापीठांतील ग्रंथालये** :– आपण आपल्या देशातील विद्यापीठांच्या ग्रंथालयात असलेली ग्रंथ संख्या पाहिली. आता वर्तमान काळातील जागतिक दर्जाच्या विद्यापीठातील ग्रंथसंख्या पाहूया. दि. ८ मार्च २०१५ ला विकीपिडीया वरून प्राप्त माहितीनुसार 'इंग्लडमधील 'ब्रिटीश लायब्ररी युनायटेड किंगडम येथे १७०० लाख ग्रंथ आहेत. वॉशिंग्टन (अमेरिका) येथील 'लायब्ररी ऑफ कॉंग्रेस युनायटेड स्टेट्स' या ग्रंथालयात १५८० लाख ग्रंथ आहेत. कॅनडा देशाच्या ओटावा या शहरातील 'लायब्ररी अँड आर्चीव्हज कॅनडा' येथील ग्रंथालयात ५४० लाख ग्रंथ आहेत. अमेरिकेतील 'न्यू यॉर्क पब्लिक लायब्ररी युनायटेड स्टेट्स' या ग्रंथालयात ५३१० लाख ग्रंथ

आहेत. रशियाच्या मास्को येथील 'रशियन स्टेट लायब्ररी, रशिया' ग्रंथालयात ४ कोटी ७७ हजार ग्रंथ आहेत. रशियाच्या सेंट पिटर्सबर्ग शहरातील 'नॅशनल लायब्ररी ऑफ रशिया येथे तीन कोटी ६५ लाख ग्रंथ आहेत. मास्को शहरातील 'रशियन ॲकॅडमी ऑफ सायंसेस' या ग्रंथालयात १ कोटी ५० लाख ग्रंथ आहेत. सेंट पिटर्सबर्ग शहरातील 'लायब्ररी ऑफ रशियन अकॅडमी ऑफ सायन्सेस' या ग्रथालयात २ कोटी ६५ लाख ग्रंथ आहेत. फ्रान्स देशातील 'बिब्लीओथेक नॅशनल डे फ्रान्स' या ग्रंथालयात ४ कोटी ग्रंथ आहेत. चीन या देशातील बिजींग शहरातील नॅशनल लायब्ररी ऑफ चायना' मध्ये तीन कोटी बारा लाख ग्रंथ आहेत. 'जर्मनी या देशातील प्लेपझीग शहरातील' जर्मन नॅशनल लायब्ररी, जर्मनी येथील ग्रंथालयात दोन कोटी ४७ लाख ग्रंथ आहेत. बर्लिन शहरातील' बर्लिन स्टेट लायब्ररी, जर्मनी' येथे २ कोटी ३४ लाख ग्रंथ आहेत. डेन्मार्क देशातील कोपेनहगन या शहरातील 'रॉयल डॅनिश लायब्ररी' या ग्रंथालयात ३ कोटी २ लाख ग्रंथ आहेत. स्पेन देशातील, माद्रीद शहरातील' बिब्लीओटेका नॅशनल दे इस्पाना स्पेन' या ग्रंथालयात २ कोटी ५० लाख ग्रंथ आहेत. स्वीडन या देशातील स्टॉकहोम शहरातील 'नॅशनल लायब्ररी ऑफ स्वीडेन' येथे १ कोटी ३० लाख ग्रंथ आहेत. जपानमधील टोकीओ शहरातील 'नॅशनल डाएट लायब्ररी, जपान' या ग्रंथालयात तीन कोटी ५६ लाख ग्रंथ आहेत. युक्रेन देशातील 'वर्नाडस्की नॅशनल लायब्ररी ॲट युक्रेन' येथील ग्रंथालयात १ कोटी ५० लाख ग्रंथ आहेत. अमेरीकेतील काही महत्त्वाच्या ग्रंथालयांकडे पहा, बोस्टन शहरातील 'बोस्टन पब्लीक लायब्ररी युनायटेड स्टेट्स' येथील ग्रंथालयात २ कोटी २४ लाख ग्रंथ आहेत. अलाबानी येथील 'न्यू यॉर्क स्टेट लायब्ररी, युनायटेड स्टेट' येथे २ कोटी ग्रंथ आहेत. हॉर्वड विद्यापीठातील केंब्रीज येथील 'हॉर्वड युनिव्हर्सिटी लायब्ररी, युनायटेड स्टेट्स, येथे १ कोटी ६६ लाख ग्रंथ आहेत.'[१५]

पुस्तकाच्या संख्येच्या तुलनेत भारतातील कोणतेच विद्यापीठ यांच्या तोडीचे नाही. पुस्तकांच्या संख्येच बाबत नाही तसेच वाचकांच्या संख्येच्या बाबतही नाही. 'मसाच्युट्स इंस्टिटयुशन ऑफ टेक्नॉलाजी' या संस्थेस पाच मिलीयन पेक्षा जास्त घटक आहेत. ३ मिलीयन प्रिंटेड मटेरिअल्सचे व्हॉल्युम्स आहेत. १७ हजार जर्नल्स आहेत आणि खूप काही युएसएएच्या 'स्टॅनफोर्ड विद्यापीठ' ग्रंथालयात ९ मिलीयन व्हॉलूम्स आहेत. दोन लाख साठ हजार विशिष्ट व दुर्मिळ पुस्तके आहेत. १५ लाख द्रकश्राव्य साहित्य आहेत.

केंब्रीज विद्यापीठात जवळपास १०० ग्रंथालये आहेत. कॅलिफोर्निया येथील विद्यापीठात जगातील सर्वात जास्त ॲकॅडमिक लायब्ररी पध्दती आहेत. त्यांच्याकडे तीन कोटी ४० लाखांपेक्षा जास्त आयटेम्स आहेत. त्यांच्याकडे १०० ग्रंथालये व दहा कॅम्पस आहेत आणि या ग्रंथालयाचे उद्दिष्टय म्हणजे संशोधन कार्यासाठी वाहून घेणे आणि कॅलिफोर्नियाचे परिसरातील ग्रंथालयांना मार्गदर्शन करणे.

यावरून आपणास लक्षात येईल की आपल्या देशातील विद्यापीठांच्या ग्रंथालयांची स्थिती किती मागास आहे आणि संशोधनाच्या क्षेत्रात आपण किती मागास आहेत.

## संदर्भग्रंथ

१. कांबळे अजय बिहारी — 'नालंदा विद्यापीठातील शिक्षण पध्दती' एक ऐतिहासिक, विश्लेषण'. प्रकाशक श्रीमती ममता अजय कांबळे प्र. आ. २०१३ पृष्ठ. २१२

२. तत्रैव — पृष्ठ. २१२
३. तत्रैव — पृष्ठ. १३७
४. तत्रैव — पृष्ठ. १३७
५. तत्रैव — पृष्ठ. १३८
६. तत्रैव — पृष्ठ. १४०
७. तत्रैव — पृष्ठ. १४२
८. तत्रैव — पृष्ठ. १४४
९. तत्रैव — पृष्ठ. १४५
१०. तत्रैव — पृष्ठ. १४६
११. तत्रैव — पृष्ठ. १४५
१२. तत्रैव — पृष्ठ . १७२
१३. तत्रैव — पृष्ठ. १६०
१४. विकीपीडीया वरून प्राप्त
१५. विकीपीडीया वरून प्राप्त

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# B2B For Competitive Market place

**Prof. Rajesh S. Dongare**
Department Of Commerce
Gurukul Arts,Commerce & Sci. College ,
Nanda, Dist. Chandrapur (M.S.)
rajesh_dongare@yahoo.in

**Abstract:-**

It is felt by experts that B2B commerce through it is in an embryonic stage, its pace of penetration is tremendous. There is a significant change in the attitude of Indian business from previous years to the present stage. The Indian business community now days are alert and on the quick look out to notice anything which slashes lead time and costs all round and maximize profits. The Indian enterprises cannot ignore B2B and its potential for extensive use. corporate giants like Samsung, ITC Welcome group HCL and Infosys IT are adopting B2B initiative says the officials of DBS Internet Services Pvt. Ltd,which has implemented major B2B sites. The E-commerce technologies currently being used in India are E-mail, Internet, Internet E-mail, Web sites. The technologies are gaining momentum and for future implementation period include.

**Key Words:-**

e-market, Market strategy, New trend. Profit Maximization.

## Introduction:-

Like butterfly ballot, B2B market is confusing with so many options like purchasing portals, industry specific e-business exchanges, reverse auction procurement etc. corporate decision makers must still formulate a B2B strategy, immediately since no-body wants to be accused of missing a bus. The next big thing at the same time pertains to being responsible for pushing the company into the next big hole. Business and IT managers are in a dilemma asking a variety of questions about B2B market places, discussing on the type of benefits quantifying those benefit. Amount to be spent to gain the benefits, risks involved which may lead to lower benefit or higher costs, any reduction which may adversely happen on the return on B2B investment etc.

B2B market place developers as well as percipients have progressed far enough to begin examining and clarifying the options which are now available to businesses considering both technical and financial perspectives. Corporate decision makers then come to their own conclusions based on existing evidence and their appetite for innovation and risk.

## B2B Marketplace:-

Simplistically, a B2B marketplace a just ma web site where good and services can be exchanged between wide range of suppliers and buyers. It is many-to-many web-based trading and collaboration solution that enables companies to more efficiently buy, sell and collaborate on a global scale.

B2B market places can be categories along the following lines

1. Vertical industry specific marketplaces revolve around and satisfy the needs of a particular industry or sector.
2. Horizontal product specific market places based on specific product from around supply market that cuts across several industries.
3. Function specific marketplaces focus on specific functions when there is value in concentrating functional skills.

### Role of B2B market places:-

It has three choices during implementation of B2B systems, which are not mutually exclusive;

- Build
- Buy
- Partner

### Build:-

1. building own end-end system for both selling and buying
2. Sizeable investment of capital and resources,
3. Build approach lengthens time to market
4. Upside building of B2Bsystem is customizing them to fit your particular business requirement provides you with competitive advantage through streamlining core business processes, generating data sets about business activity that you can mine with great effect, creating unique high value features for customers and supply chain parterres

### Buying;-

1. Lessexpenses
2. Here the B2B market prefabricated B2B platforms eliminate and speed, time to market. Such platforms do not suit the particular requirements of a given industry.

3. Chances of forfeiting desired functionality, simplicity and convenience of the readymade packet by implementing such platforms exists.
4. Full featured B2Bsolutions from vendors like yantra and ironsides technologies costs mor4e. basic catalogue and shopping cart applications can be less.

**Partner:-**

1. here B2B market places come in; these places allow organizations to use a variety of e-business infrastructure function like;
   - Catalogue Publishing
   - Secure transaction services
   - Logistics management

   A marketplace provider has already been built.
2. Market places provide companies a way to work with existing communities of buyers and sellers eliminating the need to deal with them individually.

## Future trend of B2B Market places

Order-matching is inherently a very low-margin business and it takes enormous transaction volume to make it a viable business. Market places will be find it extremely difficult to service on transaction commissions alone, since pure trading commission rates are anyway heading downwards.

So, B2B market places will involve providing higher value-added services, and the following are possible avenues;

## Content:-

B2B market place of is will be centralized repositories of important industry-specific or product-specific content, Aggregating catalog from multiple vendors to publish to all buyers is a clear value proposition for buyers in term of content centralization and ease of searching. Exchanges will also collect transaction data, and can be sold in many ways. Additionally, industry news. Relevant regulatory information and analysis help make the exchange of community.

## Third party service:-

Add-on services to be B2B marketplace are a huge market. Such horizontal services as contract administration, insurance, financing. Credit rating, shipment validation etc. will be offered by exchanges as add-on to the participants.

## Collaborations:

Almost every business process between partners can be improved or completely restructured by taking it online. Exchanges thus have the great opportunity to integrate themselves seamlessly into the exciting chain of commerce and provide customers to the best of both worlds-an integrated demands/supply chain that span all relevant work-flow while still delivering the benefit of market transparency.

B2B exchanges will automate more and more relationship between partners and not just transactions, and thus become e-hubs representing the full range of business processes and interactions between trading partners.

## Federal Net Markets:-

As mentioned earlier, the e-marketplace architects have not yet agreed on common standards. So currently, buyers and sellers who participate in multiple exchanges will have to develop and maintained interfaces to each of the exchanges. This is not a sustainable trend and so sooner or later, exchanges will have to integrate and offer common gateway to participants and become federated net markets-much like the ATM networks which were forced to integrate for convenience of the consumer.

B2B marketplaces will fundamentally change how buyers and sellers are interacting. It is only a question of when, and not if, such marketplaces will develop. Problems of standards, security, cost and incentives will have to be resolved to realize the full potential of B2B marketplaces.

Significant cost savings offer a demonstrable return –on-investment that compels managements B2B as a means to gain competitive advantage.

## Conclusion:-

The appeal of doing business on the web is clear. By bringing together huge numbers of buyers and sellers and by automating transactions, web markets expand the choices available to buyers, give sellers access to new customers and reduce transaction costs for all the players. By extracting fees for the transactions occurring within the B2B market-places, market makers can earn vast revenues. And because the market places are made from software not brick and mortar

–they can scale with minimal additional investment, promising even more attractive margins as the markets grow.

As new entrants with new business models enter into the B2B space, it increasingly difficult to make sense of the landscape. We introduce a classification scheme that giver order to the seeming chaos of the new B2B market places, which we call electronic hubs, or e-hubs. The different types of e-hubs working and their creative value, will provide useful guidance not only to entrepreneurs looking to launch e-hubs but also to the many buyers and sellers developing strategies for capitalizing on B2B e-commerce.

## Reference:-

1. E-commerce strategies by Charles Trepper, 200, Microsoft Corporation.
2. Small Business Solution-E-commeerce, Brenda Kienan, Microsoft Press, Washington 2000.
3. e-Commerce, Concepts, Models and strategies C.S.V. Murthy.
4. E-business with a B2B focus (By N.Chandrasekharan-Strategic Marketing, Jan/Feb.2001).
5. Enterprise B2B.com (E-business and E-business by Vyankatesh Hariharan and B.V.Uma).
6. B2B Unplugged (E-business and E-business by Vyankatesh Hariharan and B.V.Uma).
7. Which B2B Exchange is right for you? By J.P.Morgenthal (Software Magazine30,02.01/03.01).

**Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)**

**ISSN No. 2394-8426**
**Mar – 2015**
**Issue – I, Volume – II**

# महाराष्ट्र राज्यातील काही निवडक फळांबाबतचे संशोधन

**प्रा.डॉ. सौ. शरयु मनिष पोतनुरवार**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सरदार पटेल महाविद्यालय,
चंद्रपुर
mpotnurwar@gmail.com

**सारांशः–**

आरोग्य सुव्यवस्थित असणे सदैव गरजेचे असते. आरोग्य सुदृढ असेल तरच सर्वांगिन विकास करणे शक्य असते आणि आरोग्य सुदृढ ठेवण्याकरिता आहार सुदृढ असणे निकडिचे असते. सुदृढ आहाराकरिता विविध प्रकारची फळे आहारात समाविष्ट करावित,असे आहारतज्ञ नेहमीच सुचवित असतात.त्यापैकी संत्रा व मोसंबी फळांमध्ये अशी अनेक तत्वे असतात की ज्यामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढुन मनुष्याचे आरोग्य सुदृढ राहु शकते. त्यात असलेल्या नैसर्गिक शर्करेमुळे ताजेतवाने वाटुन मनुष्य जोमाने कार्यप्रवृत्त होउ शकतो. तसेच मधुमेहासारख्या बिमारीतही संत्रा व मोसंबी ही फळे आरोग्यासाठी उत्कृष्ठ असल्याचे सांगण्यात येते.या दोन्ही फळांमध्ये **क** जीवनसत्व भरपुर प्रमाणात असते व त्यामुळे मनुष्याची रोग प्रतिकारक शक्ती वाढुन व्यक्ती बदलत्या हवामानात स्वतःला सुदृढ व निरोगी ठेउन स्वतःची कार्यक्षमता अबाधित राखु शकतो.

महाराष्ट्र राज्याचा विचार करता संत्रा व मोसंबी या फळांच्या बाबतीत इ.सन 1985–86 ते 2000–2001 या वर्षात लागवड क्षेत्र तसेच उत्पादनाच्या प्रमाणात वाढ दिसुन येते. जमीन,पाणी आणि मेहनत व ज्ञान इत्यादींचा योग्य वापर करुन संत्रा व मोसंबी या फळांची लागवड केली असता शेतकरी अधिक उत्पादन घेउन स्वतःचा आर्थिक विकास करुन घेउ शकतो आणि सोबतच समाजाला सुदृढ आरोग्य प्रदान करु शकतो.

**बीजशब्द :–**

सुदृढ आरोग्य, लागवड क्षेत्र, उत्पादन,उत्पन्न ,सकारात्मक विचार,ज्ञान,सद्सद्विवेकबुध्दी,जिज्ञासा,प्रयत्न

**प्रस्तावना:–**

कोणत्याही प्रकारच्या विकासाकरिता सकारात्मक विचार ,ज्ञान,सद्सद्विवेकबुध्दी ,जिज्ञासा ,प्रयत्न, कार्यशीलता इत्यादी अनेक प्रकारांची आवश्यकता असते.या सर्व प्रकारच्या आवश्यकता पुर्ण करण्याकरिता मात्र आरोग्य सुव्यवस्थित असणे गरजेचे असते. आरोग्य सुदृढ असेल तरच विकास करणे शक्य असते. आणि आरोग्य सुदृढ ठेवण्याकरिता आहार सुदृढ असणे निकडिचे असते. सुदृढ आहाराकरिता ,विविध प्रकारची फळे आहारात समाविष्ट करावित,असे आहारतज्ञ नेहमीच सुचवित असतात.

**उद्येश :–**

काही निवडक फळांबाबत अर्थशात्रीय दृष्टिने संशोधन करुन उत्पन्न,उत्पादन,लागवड क्षेत्र इत्यादींचा अभ्यास करण्याचा मानस सुदृढ आहाराच्या गरजेतुनच निर्माण झाला.

**फळांची निवड :–**

संत्रा व मोसंबी या फळांची निवड संशोधनाकरिता करण्याचे ठरविण्यात आले.याचे मुख्य कारण म्हणजे या फळांमध्ये अशी अनेक तत्वे आहेत की ज्यामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढुन मनुष्याचे आरोग्य सुदृढ राहु शकते. त्यात असलेल्या नैसर्गिक शर्करेमुळे ताजेतवाने वाटुन मनुष्य जोमाने कार्यप्रवृत्त होउ शकतो. तसेच मधुमेहासारख्या बिमारीतही संत्रा व मोसंबी ही फळे आरोग्यासाठी उत्कृष्ठ असल्याचे सांगण्यात येते.या दोन्ही फळांमध्ये **क** जीवनसत्व भरपुर प्रमाणात असते की

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

ज्यामुळे मनुष्याची रोग प्रतिकारक शक्ती वाढुन व्यक्ती बदलत्या हवामानात स्वतःला सुदृढ व निरोगी ठेउन स्वतःची कार्यक्षमता अबाधित राखु शकतो.

| पिक– संत्री | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र (प्रतिशत प्रमाण) | प्रती हेक्टर फळे धारण करणा–या झाडांची संख्या (टन) | दर झाडाचे सरासरी उत्पन्न | | उत्पादन (00 टन) | उत्पादन (प्रतिशत प्रमाण) |
| | | | | किलो | फळांची संख्या | | |
| 1985–86 | 26920 | 100 | 218 | 24.59 | 231 | 1442.4 | 100 |
| 1986–87 | 28200 | 104.75 | 233 | 23.33 | 216 | 1532.8 | 106.27 |
| 1987–88 | 28971 | 107.62 | 283 | 14.34 | 144 | 1175.4 | 81.49 |
| 1988–89 | 29941 | 111.22 | 260 | 28.89 | 258 | 2249.2 | 155.93 |
| 1989–90 | 29941 | 111.22 | 259 | 22.94 | 209 | 1778.7 | 123.32 |
| 1990–91 | 29941 | 111.22 | 266 | 28.85 | 260 | 2297.7 | 159.30 |
| 1991–92 | 34949 | 129.83 | 158 | 11.80 | 170 | 652.6 | 45.24 |
| 1992–93 | 34949 | 129.83 | 215 | 23.53 | 274 | 1770.2 | 122.73 |
| 1993–94 | 45266 | 168.15 | 224 | 35.63 | 318 | 3612.8 | 250.47 |
| 1994–95 | 45266 | 168.15 | 257 | 39.09 | 333 | 4547.6 | 315.28 |
| 1995–96 | 53843 | 200.01 | 272 | 52.19 | 383 | 7643.6 | 529.92 |
| 1996–97 | 87347 | 324.47 | 276 | 50.49 | 301 | 12172.9 | 843.93 |
| 1997–98 | 87347 | 324.47 | 256 | 41.37 | 277 | 9257.4 | 641.81 |
| 1998–99 | 123988 | 460.58 | 267 | 39.46 | 338 | 13063.50 | 9056.78 |
| 1999–2000 | 125604 | 466.58 | 265 | 32.36 | 220 | 10771.80 | 7467.97 |
| 2000–01 | 127562 | 476.84 | 253 | 36.47 | 322 | 11870.70 | 8229.83 |

संत्री :–

महाराष्ट्र राज्याचा विचार करता संत्र्यांच्या बाबतीत इ.सन. 1985–86 ते 2000–2001या वर्षात लागवड क्षेत्र तसेच उत्पादनाच्या प्रमाणात वाढ दिसुन येते. इ.सन. 1985–86ला आधार वर्ष मानले असता म्हणजेच इ.सन. 1985–86ला 100 प्रतिशत प्रमाण मानले असता इ.सन. 1985–86ते 1995–96या दहा वर्षात लागवड क्षेत्राचे प्रतिशत प्रमाण दुप्पट असल्याचे दिसुन येते. तर याच दहा वर्षाच्या कालावधीनंतर सातत्याने तीनपट आणि चारपटीपेक्षाही अधिक वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

इ.सन. 1985–86ते2000–2001 या पंधरा वर्षाच्या कालावधीत प्रती हेक्टर फळे धारण करणा–या झाडांच्या संख्येत अल्पशी वाढ दिसुन येते.परंतु प्रत्येक संत्र्यांच्या झाडाच्या फलधारण क्षमतेमधील वाढ मात्र अधिक जास्त प्रमाणात आढळते.

इ.सन. 1985–86ते2000–2001 या पंधरा वर्षाच्या कालावधीत उत्पादनाच्या प्रतिशत प्रमाणात फारच अधिक वाढ झाल्याचे निदर्शनास येते. इ.सन.1985–86च्या तुलनेत इ.सन. 1995–96 या दहा वर्षात पाचपटीपेक्षा अधिक वाढ(529.92प्रतिशत)

झाल्याचे निदर्शनास येते.तर त्यानंतरच्या प्रत्येक वर्षात 8 ते 90 पट वाढ निदर्शनास येते इ.सन. 1998–99 मध्ये 90पटीपेक्षाही अधिक वाढ (9056.75 प्रतिशत) दिसुन येते.

| पिक– मोसंबी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र (प्रतिशत प्रमाण) | प्रती हेक्टर फळे धारण करणा–या झाडांची संख्या (टन) | दर झाडाचे सरासरी उत्पन्न | | उत्पादन (00 टन) | उत्पादन (प्रतिशत प्रमाण) |
| | | | | किलो | फळांची संख्या | | |
| 1985–86 | 993 | 100 | 215 | 16.99 | 124 | 36.27 | 100 |
| 1986–87 | 1632 | 164.35 | 254 | 20.60 | 168 | 85.58 | 235.95 |
| 1987–88 | 1632 | 164.35 | 292 | 29.70 | 183 | 141.52 | 390.18 |
| 1988–89 | 3006 | 302.72 | 295 | 32.56 | 246 | 286.98 | 791.23 |
| 1989–90 | 3006 | 302.72 | 305 | 39.47 | 171 | 361.94 | 997.90 |
| 1990–91 | 3690 | 371.60 | 302 | 30.41 | 178 | 338.93 | 934.46 |
| 1991–92 | 6726 | 677.34 | 316 | 30.00 | 192 | 660.06 | 1819.85 |
| 1992–93 | 6726 | 677.34 | 326 | 32.52 | 192 | 713.04 | 1965.92 |
| 1993–94 | 6845 | 689.33 | 329 | 45.34 | 217 | 1020.99 | 2818.97 |
| 1994–95 | 6845 | 689.33 | 269 | 37.21 | 187 | 685.25 | 1889.30 |
| 1995–96 | 6845 | 689.33 | 273 | 37.86 | 243 | 707.51 | 1950.68 |
| 1996–97 | 14145 | 1424.47 | 267 | 42.65 | 230 | 1610.88 | 4441.36 |
| 1997–98 | 14989 | 1509.47 | 294 | 39.13 | 224 | 1724.51 | 4754.65 |
| 1998–99 | 14949 | 1505.44 | 278 | 44.62 | 231 | 1812.99 | 4998.59 |
| 1999–2000 | 19930 | 2007.05 | 272 | 55.03 | 291 | 2982.99 | 8224.40 |
| 2000–01 | 32141 | 3236.76 | 307 | 33.27 | 182 | 3236.03 | 8922.06 |

**मोसंबी :–**

महाराष्ट्र राज्याचा विचार करता मोसंबीच्या बाबतीत इ.सन. 1985–86 ते 2000–2001या वर्षात उत्पादनाच्या प्रमाणात वाढ दिसुन येते. इ.सन. 1985–86ला आधार वर्ष मानले असता म्हणजेच इ.सन. 1985–86 ला 100 प्रतिशत प्रमाण मानले असता 1985–86 ते 1990–91 पर्यंत 9पट वाढ तर 1991–92ला 18पट वाढ आणि त्यानंतरच्या वर्षात सतत वाढ होतांना दिसुन येते.परंतु इ.सन. 1994–95 या वर्षातील वाढीचे प्रमाण मात्र कमी दिसते. त्यानंतर इ.सन. 1995–96मधे इ.सन. 1994–95 या वर्षापेक्षा थोडी अधिक वाढ झाल्याचे दिसुन येते. इ.सन. 1995–96नंतर मात्र सातत्याने अधिक प्रमाणात वाढ होतांना दिसुन येते. इ.सन. 2000–2001 मध्ये तर (8922.06 प्रतिशत)इतकी अधिक वाढ निदर्शनास येते.

महाराष्ट्र राज्याचा विचार करता मोसंबीच्या बाबतीत इ.सन. 1985–86 ते 2000–2001या वर्षात लागवड क्षेत्राच्या प्रमाणात वाढ दिसुन येते. इ.सन. 1985–86ला आधार वर्ष मानले असता म्हणजेच इ.सन. 1985–86ला 100

प्रतिशत प्रमाण मानले असता इ.सन. 1995–96पर्यंत 6पटीपेक्षाही अधिक (689.33प्रतिशत) वाढ निदर्शनास येते आणि प्रामुख्याने ही वाढ इ.सन. 1993–94ते 1995–96पर्यंत म्हणजेच सतत तीन वर्ष स्थिर (689.33प्रतिशत इतकी )आहे.

इ.सन. 1985–86 ते 2000–2001 या पंधरा वर्षाच्या कालावधीत प्रती हेक्टर फळे धारण करणा–या झाडांच्या संख्येत इ.सन.1989–90 ते 1993–94पर्यंत आणि इ.सन. 2000–2001या वर्षात अल्पशी वाढ दिसुन येते.परंतु प्रत्येक मोसंबीच्या झाडाच्या फलधारण क्षमतेमधील वाढ मात्र अधिक जास्त प्रमाणात झालेली आढळते.

निष्कर्ष :–

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की जर जमिन,पाणी आणि मेहनत व ज्ञान इत्यादींचा योग्य वापर करुन संत्रा व मोसंबी या फळांची लागवड केली असता शेतकरी अधिक उत्पादन घेउन स्वतःचा आर्थिक विकास करुन घेउ शकतो आणि सोबतच समाजाला सुदृढ आरोग्य प्रदान करु शकतो.

संदर्भ :–

1. महाराष्ट्राची कृषी सांख्यिकीविषयक जिल्हावार माहिती (1991–92व 1992–93)
2. महाराष्ट्राची कृषी सांख्यिकीविषयक जिल्हावार माहिती भाग –2 (1996–97 व 1997–98)
3. महाराष्ट्राची कृषी सांख्यिकीविषयक जिल्हावार माहिती भाग –2 ( 2002)

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# डॉ. आंबेडकरांची राज्यसमाजवादाची संकल्पना आणि भारतीय संविधान

प्रा. संजय के. लाटेलवार
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा जि. चंद्रपूर.
email – sanjaylatelwar@gmail.com
mob. no. 9767076693

## प्रस्तावना

डॉ. आंबेडकरांना विषमता विरहीत समाज निर्माण करावयाचा होता. जशी त्यांना सामाजिक विषमता नको होती, तशी त्यांना आर्थिक विषमताही नको होती. संपूर्ण भारत एका समानतेच्या धाग्यात बांधला जावा हे त्यांचे स्वप्न होते. एवढेच नव्हे तर विषमतेच्या सर्वच आधारभूत सामग्रीलाही त्यांचा विरोध होता. जात आणि वर्ग ही दुष्ट रचना आहे आणि ती गोरगरिबांची नागवणूक करण्यासाठी निर्माण करण्यात आली आहे. या दुहेरी दुष्ट रचनेचा पराभव करणे, या कंटकयुक्त रचनेचा नाश करणे एवढेच नव्हे, तर या कंटकयुक्त रचनेचे मानसशास्त्र आमूलाग्र बदलणे ही बाब डॉ. आंबेडकरांना महत्वाची वाटत होती. भारतीय समाजव्यवस्था अत्यंत खालच्या थराला पोचली असतांना भारताला स्वातंत्र्य मिळाले आहे आणि ते टिकवायचे असेल, तर भारतीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीच्या स्वरूपात परावर्तीत करावी लागेल, तरच या इतक्या कष्टाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग होईल. म्हणून समाजात जाती नसाव्यात तसे वर्गही नसावेत ही डॉ. आंबेडकरांची धारणा होती. याचा अर्थ कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तिच्या वर्चस्वाखाली नसावी आणि यासाठी जाती आणि वर्ग नसावेतच. समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक न्याय निर्माण झाला पाहिजे हे डॉ. आंबेडकरांचे ध्येय होते.

समाजात सामाजिक समता निर्माण होणे म्हणजेच कल्याणकारी राज्य निर्माण होणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तिचा विकास, व्यक्ति–व्यक्तित बंधूभाव निर्माण होणे म्हणजेच समाज रचनेला बळकटी प्राप्त होणे होय. राज्य लोककल्याणासाठी आवश्यक आहे आणि लोककल्याणासठी परिवर्तन देखील आवश्यक आहे. राज्यसमाजवादाच्या स्थापनेसाठी आणि त्याच्या यशस्वीतेसाठी राज्य आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांना लोकशाही ही जीवनशैली बनावी असे वाटत होते. लोकशाही हा शासन प्रकार नसून ती शोषणविहीन जीवनशैली आहे. लोकशाही यशस्वी करण्यासाठी वर्गविहीन समाज, सशक्त विरोधी पक्ष, अल्पसंख्याकांच्या मताचा आदर, नितिमान लोक, कायद्याची आणि प्रशासनाची समानता आणि अन्यायाविरुद्ध लढून न्याय प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध झालेली सद्सद्विवेकबुद्धी या गोष्टींची आवश्यकता असते. राजकीय लोकशाही, आर्थिक लोकशाही, सामाजिक लोकशाही ही लोकशाहीची अविभाज्य अंगे आहेत असे डॉ. आंबेडकर मानत. त्यामूळे अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यात भारतीय समाज तयाार व्हावा; त्या व्यवस्थेचे अनुकरण म्हणजे खरे लोकशाही राज्य. या लोकशाही राज्यात सर्वांना समानतेने जगण्याचे अधिकार प्राप्त होणे आवश्यक आहे. याची जाणिव डॉ. आंबेडकरांना होती. विषमतेने विखुरलेला हा भारतीय समाज आणि या समाजातील बलवान वर्ग आपल्या खालच्या जातीतील वर्गाला टिकू देणार नाही. म्हणून संविधानातच अशाप्रकारची व्यवस्था असावी जिला कोणिही मोडू शकणार नाही, माझ्या गरीब आणि अशिक्षित

समाजाला न्याय मिळविण्यासाठी कुणापूढेही हात पसरण्याची आवश्यता पडू नये, यासाठी संविधानातच डॉ. आंबेडकरांनी अशी व्यवस्था निर्माण केली. ज्यातून सामाजिक न्याय, बंधूता, समता निर्माण होण्यास मदत होईल.

## डॉ. आंबेडकरांचा अर्थविचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजात आर्थिक समता स्थापन करायची होती. ती निर्माण करण्यासाठी आपली समाजवादाची भूमिका 'स्टेट ॲड मायनॉरिटिज' मध्ये मांडली आहे. समाजवाद संसदीय लोकशाहीद्वारा समाजात रुजविला पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. समाजातील गरीब आणि पिढलेल्या वर्गाला आर्थिक विषमतेतून बाहेर काढण्यासठी, त्यांना समतेचे आणि स्वातंत्र्याचे मुक्त जीवन प्राप्त करून देण्यासाठी राज्य समाजवादाची आवश्यकता होती. आणि म्हणून डॉ. आंबेडकर संविधान सभेतील भाषनात म्हणतात, "आज भारतीय व्यक्ती दोन निरनिराळ्या ध्येयवादानी नियंत्रित आहेत. राज्यघटनेच्या प्रस्तावात सूचित केलला ध्येयवाद आणि धर्मात अंतर्भुत केलेला सामाजिक ध्येयवाद. ज्याला समज आहे त्याला कळू शकेल की हे दोन परस्परविसंगत ध्येयवाद आहेत. राजकीय ध्येयवादामुळे स्वातंत्र्य, समता, सहभाव या जीवनमूल्यांना मान्यता मिळाली आहे. तथापि प्रचलित सनातनी वृत्तीच्या सामाजिक ध्येयवादामूळे ही तत्वे व्यवहारात नाकारली गेली आहेत असे हे विसंगत जीवन किती काळ चालणार आहे? कधीतरी एक दुसऱ्याला शरण गेल्याशिवाय उपायच नाही." आपण राजकीय जीवनात एक व्यक्ती एक मूल्य या तत्वाचा स्वीकार आणि आर्थिक सामजिक जीवनात मात्र या तत्वाला नकार हा अंतर्विरोध आहे. ही आर्थिक सामाजिक विषमता आपण संपवल्याशिवाय खरी सामाजिक समता प्रस्तापीत करता येणार नाही.

राजकीय लोकशाहीला बळकटी देण्याचे खरे कार्य सामाजिक आणि आर्थिक लोकशाही करते. समाजातील सामजिक आणि आर्थिक लोकशाही बळकट असेल तरच खरी राजकीय लोकशाही निर्माण होऊ शकते. भारतात माणूस जन्मताच त्याला जात चिकटवण्याची परंपरा आहे. या परंपरेमुळे इथल्या माणुसकीचे संपूर्ण दिवाळे काढले आहे. या वर्णानी आणि जातींनी माणसामध्ये कायम दुरावा टिकवून ठेवला आहे. त्यामूळे बंधूभावाची संकल्पना निर्माणच होऊ शकली नाही. भारतात निर्माण झालेली जातीव्यवस्था माणसांना मानसापासून वेगळे करणारी ठरली. प्रत्येक जात आपले स्वतंत्र अस्तीत्व टिकविण्यासाठी दुसऱ्या जातीच्या अहिताचा विचार करू लागली. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, "कोणतीही एखादी जात अवनत झाली, तर तीच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्यशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे व ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून किंवा त्यांची त्रेधा कशी उडते ती गंमत पाहण्यासाठी म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा; जर का इतरांच्या खोलीत छिद्र पाडले, तर सर्व बोटीबरोर त्यालाही, आधी नाही तरी मागाहून का होईना जलसमाधी ही घ्यवी लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने प्रत्यक्ष नव्हे तरी अप्रत्यक्षपणे तरी नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार आहे यात बिलकूल शंका नाही." भारतीय समाजाची स्थिती आगबोटीतील प्रवाशांसारखी आहे. अनेक जातीत आणि धर्मात विखुरलेले राष्ट्राला एका बंधनात बांधता येत नाही. ती विषमता आधी आपल्यला नष्ट करावी लागेल. म्हणून भारतीय समाजात निर्माण झालेली ही सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आधी आर्थिक विषमता नष्ट होणे आवश्यक आहे. सामाजिक लोकशाहीचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला आपल्या देशाची ही

परिस्थिती बदलविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच खरी राजकीय लोकशाही असित्त्वात येऊ शकेल. आर्थिक समता स्थापन करण्याच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी वीमा, उद्योगधंदे आणि शेती उद्योग सरकारच्या मालकिची असण्याची आवश्यकता सांगितली होती. तिची अमलबजावणी न झाल्याने आज स्वातंत्र्याच्या ६५—७० वर्षानंतरही आर्थिक विषमता कायमय असल्याचे दिसते.

## डॉ. आंबेडकरांचा सामजिक विचार

डॉ. आंबेडकर म्हणतात या देशात समता प्रस्तापीत करायची असेल; तर अस्पृशता नष्ट करावी लागेल. ती नष्ट करण्यकरिता आणि सामाजिक समता निर्माण करण्याकरिता आपल्या देशात असणारी वर्गनिहाय परिस्थिती नष्ट करावी लागेल. पण केवळ जाती आणि वर्ग नष्ट करूण चालणार नाही तर वर्ण निर्मूलनाचीही आवश्यकता आहे. केवळ वर्ण निर्मूलन झाले म्हणजे संपले असेही नाही. जगाचा विचार केला तर दोनच जाती आहेत असे स्पष्ट करतांना ते म्हणतात; “जगात फक्त दोनच जाती आहेत. पहिली श्रीमंतांची आणि दुसरी गरिबांची.” आणि म्हणून समाजातील सर्व प्रकारचे वर्गीकरण संपले पाहिजेत. समाजाला वर्गातीत करण्याची आवश्यता आहे. वर्गातीत करण्याची प्रक्रिया म्हणजे समाजाच्या पुनर्रचनेची प्रक्रिया होय. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही या पुनर्रचीत समाजाची जीवनमूल्ये असावीत. याचाच अर्थ समाजात वर्णभेद, वर्गभेद आणि समाजभेदही नकोत. हे भेद कायम असेणे म्हण्जे समाजातील बंधुभाव नष्ट होणे आहे. समाजात कोणत्याही प्रकारची वर्गवारी असणे म्हणजेच समतेचा अभाव असणे आहे. त्यामुळे समाजातील सर्व भेदांचा नाश हेच खऱ्या सामाजिक लोकशाहीची प्रस्तापना होय. आपल्याला खरी राज्यलोकशाही निर्माण करायची असेल तर सर्व भेदांचा नाश हाच एक मार्ग उरतो.

## डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार

डॉ. आंबेडकरांना जशी आर्थिक, सामाजिक समता हवी होती, तशीच त्यांना राजकीय समताही हवी होती. ती निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचा आपल्याला परिचय येतो. राजकीय अधिकारासाठी लढल्या गेलेल्या आपल्या स्वांत्र्य लढयात यशस्वी झाल्यानंतर जेव्हा राजकी स्थर्य निर्माण करण्यासाठी संविधानाची निर्माण करण्यात आली तेव्हा डॉ. आंबेडकरांनी आपल्या अपेक्षीत अधिकार सर्वसामन्यानंपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. जात आणि वर्ग ही दुष्ट रचना आहे आणि ती गोरगरिबांची नागवणूक करण्यासाठीच निर्माण करण्यात आली आहे. तेव्हा या दुहेरी दुष्ट रचनेचा नाश करणे, या शोषनयुक्त रचनेचा नाश करणे एवढेच नव्हे तर ही शोषनयुक्त समाजाची मानसिकता बदलून टाकणे आवश्यक आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. जात आणि वर्ग यांना हजारो वर्षाचे संस्कार समाजमनावर केले गेले आहेत. धर्म, साहित्य आणि तत्वज्ञान याचा वापर करून ही शोषनयुक्त मानसिकता आणि घोटीव दुष्ट परिवर्तनविरोधी गोष्टी निर्माण केल्या गेली आहेत. तेव्हा या विषमतावादी मानसशास्त्राचे निर्मूलन करण्यासठी या मानसशास्त्राला जन्म देणारी आणि त्यांचे संगोपन करणारी वैचारिक हत्यारे पूर्ण मोडून काढली पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते.

राजकीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी स्तरहीन समाज, बलवान विरोधी पक्ष, कायद्याची आणि प्रशासनाची समानता संविधानिक नैतिकता, अल्पसंख्याकांच्या मताचा आदर, नीतिमान लोक आणि अन्यायविरूद्ध लढून न्याय प्राप्ती करण्यासाठी कटिबद्ध असलेली सद्सद्‌विवेकबुद्धी या गोष्टींची आवश्यकता असते. राजकीय लोकशाही निर्माण होण्यासाठी, समाजात या

वातावरणाची निर्मिती करण्यासाठी देशातील विघातक वातावरण वेगवेगळया धर्मांनी, जातींनी आणि प्रथांनी—परंपरांनी निर्माण केलेले आहे. म्हणून सांसदीय लोकशाही निर्माण करण्यासाठी राज्यघटनेत या तरतुदिंची आवश्यकता डॉ. आंबेडकरांना वाटते. केंद्रिय वा राज्य कार्यकारिणीला विधिमंडळाच्या कार्यकाळाआधी बरखास्त करता येणार नाही. विधिमंडळाचे सभासद नसलेल्या मंत्रिमंडळाच्या सदस्यांना विधिमंडळाच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार राहील, पंतप्रधानांची निवड विधिमंडळातील सर्व सदस्याद्वारा केली जाईल. मंत्रिमंडळातील अल्पसंख्याकांच्या सदस्यांची निवड सभागृहातील अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी करतील तसेच मंत्रिमंडळातील कोणत्याही सदस्याला केवळ भ्रष्टाचार किंवा राष्ट्रद्रोहाच्या आरोपावरून महाभियोगाद्वारे काढून टाकले जाईल. इत्यादी तरतूदी डॉ. आंबेडकांनी संविधानातच नमूद केल्या आहेत.

## समारोप

भारतासारख्या अत्यंत विषम परिस्थिती असलेल्या समाज रचनेच्या या देशात लोकशाही शासन पध्दतीला यशस्वी करण्याकरिता डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समता, आर्थिक समता आणि राजकीय समता स्थापन करण्याचा परिपूर्ण प्रयत्न केल्याचे आपल्याला ही स्वातंत्र्याची सुखद फळे चाखता येत आहेत असेच म्हणावे लागते. राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीत बदलविण्याचा पूर्ण प्रयत्न संविधानाच्या आधारानी डॉ. आंबेडकरांनी केल्याचे दिसून येते. आणि त्यामूळेच भारताची आजची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यात आणि यशस्वी ठरण्यात डॉ. आंबेडकरांचीच राज्यसमाजवादाची संकल्पना साकारा झाल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची :

१) आंबेडकरवादी मराठी सहित्य – डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

२) लोकराज्य – धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक ऑक्टोबंर २००६

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# The Life And Vision Of Dr. Babasaheb Ambedkar

**Dr. Pandharinath L. Dhengle**
Associate professor,
Shri Shankarrao Bezalwar Arts and Commerce College Aheri Dist. Gadchiroli. (MS)
pldhengle@gmail.com
9420185886

**Prof. Ravindra D. Hajare**
Associate professor,
Shri Shankarrao Bezalwar Arts and Commerce College Aheri Dist. Gadchiroli. (MS)
ravindrahajare150666@gmail.com
9403867682

**Abstract:**

Dr. B. R. Ambedkar has been a great son of mother in the true sense of the word. India. His entire life has been a beacon light for every Indian and those who suffered much under caste system. His anthropological researches have been very phenomenal in his work as an activist and fighter for the downtrodden. Being inspired by his father, he made up his mind to devote his life to the service of his people. His satyagrahas helped him achieve rights for the Dalits. With his mission and vision he forced the other people to be introvert and think of the downtrodden humanly. His vision has been reflected in the constitution of India.

**Key words:**

Untouchability, mission, Varna System, constitution

**Introduction:**

Dr. B. R. Ambedkar is mostly remembered as the Father of the Indian Constitution. He is also referred as the Savior as the Depressed Classes called Dalist today. Ranging from his early education, his experiences, his wide reading, his researches as an anthropologist, his struggle as activist, his writings, his political, economical and social views, and above all his mission of eradicating untouchability, his work as a politician and legislator all amount to call a great fighter of mankind. He took an idea, made it one idea of his life, thought of it, dreamed of it, lived on that idea, let his brain, muscles, nurses every part of his body be full of the idea, and just left other ideas alone. This is the way a great spiritual giant like B. R. Ambedkar succeeded in his mission. He lived an arduous life. He lived for his mission died for it. Hence his life itself is a mission.

Ambedkar has played the part of destiny in the liberation of suppressed humanity in India. So it is necessary to understand his life, character and mission and know his as he is and as he is distorted by his enemies and defiled by his devotees.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

**His Parentage and its Impression:**

Hailing from a poor family, belonging to one of the untouchable communities in India that had different names in different parts of the country, Ambedkar witnessed inhuman treatment given to those lowest strata of human life, which were deprived of fundamental needs. They were forced to occupy their dwelling in the dingy dirty and unhygienic outskirts of villages and towns for habitations, where they lived in dark, insanitary, and miserable smoky shanties or cottages. The children were not allowed to go to schools attended by caste Hindus. Though they worshipped Hindu Gods and observed the same festivals, the Hindu temples were closed to

**The Origin of the Untouchability:**

The origin of the untouchability is found actual practice of original principles of division of labor, which did not sustain for long. The society was divided according to four Varnas and those who served all higher three were called Shudras. But in the course of time, the Varnas became watertight compartments and degenerated later into present caste system. The Shudras were degraded and segregated as untouchables.

However this disruptive system did not go unchallenged. Several worthy sons of India made attempts to free society from this system. Starting from Lord Buddha, Ramanuja, Basavana, Eknath, Tukaram, Rohidas, Kabir, who succeeded to some extent in their efforts, to modern age reformers, who, with spiritual awakening tried to bring about changes in society. The period of Spiritual Enlightenment in India saw another wave of socio-religious revival led by Raja Ram Mohan Ray, followed by many other social reformers like Jyotirao Phule, V. R. Shinde, Karve, B. Malbari, Ranade, Agarkar, Telang etc. They all played vital role in this period despite the neutral role of the British rulers. Among the Indian Princes the work done by Sayajirao Gaikwad of Baroda and Shri Shahu Maharaj of Kolhapur to eradicate untouchability by starting schools for the untouchables was commendable. Gopal Baba Walangkar and Dayanand made great efforts too.

**Socio-Political Revival in Maharashtra:**

By the 1890s a strong socio-political revival had set in even in Maharashtra. The main problems that confronted the leaders along with political backwardness were the caste system, untouchability, child marring, widow remarriage, and emancipation of women from all bondages. A bitter controversy arose over whether social reforms should take precedence over political reforms. The British naturally wanted Indians to focus on social reforms and bypass the political

agitation. But some of the Indian leaders wanted both need to happen simultaneously. The foremost among them were Ranade, Agarkar, Tilak. They actively propagated social and political reforms and created discounted among the masses to force the British government to confer rights to them. Besides, they also fought against the orthodox Hindus who were not ready for change. It was this period that created a platform for the true champion to emerge.

Dr. Ambedkar had derived from his father his painstaking spirit, forceful mental energy and intense interest in the welfare of his society. Ramji exerted great influence on young mind of Bhim. A friend and admirer of Phule, Ramji was aware of the social problems faced by his community.

During his early days at Satara, Bhimrao realized painfully what the stigma of untouchability meant. There were so many rude and shattering shocks to the budding mind of Bhim. They left an indelible impression on his young mind that was so strong, so sensitive and yet resolute. Such insults engendered in him a burring hatred for Hinduism, which later compelled him to launch a rigorous mission and movement. Bhim, in his youth like Tilak and Saverkar, developed a passion for reading. His desire to possess books was insatiable, a wide reading, deep knowledge and historical perspective bestowed upon him a certain prestige and toning.

Notwithstanding the ills and intolerable insults inflicted upon him and stimulated by his father to rise to high position in life encouraged by broad-minded men, Bhim passed matriculation in 1907, BA in 1912 against all odds. He concentrated more on reading than on scoring good marks. It was his aim to arm himself with every possible missile, made himself master of a repository of knowledge and develop the power of his mind to prepare him for higher attainment and a new life that was to open the portals and possibilities of a great career, which he obtained many times in his life. The most important and significant was his appointment as chairman of Drafting Committee of the constitution of independent India.

**The Whirlwind of Discontent: Bhimrao's Mission:**

It was during these periods that right of Indians was totally suppressed by the British govt.… This gave rise to a whirlwind of discontent. Tilak was sent to Mandalay and Savarkar to Andaman and imprisoned several others. These events shook Maharshtra violently. This sate of repression agitated the strong currents of Bhim's mind. They were seen when he wrote "The Evolution of Provincial Finance in British India". The mission in the life of Ambedkar was

launched from his young age. What he saw, read or experienced, were bursting out in form of his thoughts. Infused with strength of will to resist worldly temptation and a depth of spirituality, Bhimrao paved way to uplift the downtrodden and the depressed and to eradicate untouchability on all grounds-social, political spiritual and economical. He himself had sustained so many wounds during his education and also while working in boroda for the Maharaja and in a colllege in Bombay. They were always haunting and troubling his mind and provoking him to do something substantial and perpetual to win rights for this community in particular and the Hinduism in general. His life itself has been a Yadnya, first Dnyan Yandnya and then Karma Yadnya. The real Dnyan Yandnya started when he went to America. He studied for 18 hours a day and went on endlessly digging knowledge. His stay in the U.S., also exercise great influence on him. After becoming Barrister and getting a mean of earning a living, he literally threw him in the Karma Yadnya.

**The Activities of the Depressed Classes Mission:**

The activities of Depressed Classes were in progress. The Indian National Congress was growing conscious of the existence of the Depressed Classes. But its sudden love emanated for the Untouchables was because of the result of the British policies. The British rulers were trying at all cost to divide the Indians and rule over then under the name of caste and religion. They were showing special favor for the Muslim League by sanctioning separate constituencies for them but purposefully neglecting the demands of the Depressed Classes. It was this historical moment when Ambedkar jumped into the mahayadnya of Karma initiating his mission. Finding the conferences of the DC reserved and skeptical initially, Ambedkar did not associate himself with them. He was waiting for right time to draw upon his energy and brain power. His mind was busy with the ideas of intellectual conquest which he earned as a professor first then a lawyer. Wanton insults and frequent humiliation were tempting him to go the roots of the teething trouble. So gradually he began to feel the pulse of the Untouchables and was silently contacting all the centers of sympathizers with the cause. He was also impressed by the rigorous campaign launched by Shahu Maharaj to eradicate untouchability by promoting education among the lower classes, eradicating prejudices and barriers created by the caste system.

**Dr. Ambedkar's Battle against Varna System: His Message.**

Dr. Ambedkar was a great fighter. He fought on all grounds. He fought legal, political, social, spiritual and intellectual fights, and surpassed all those who criticized him as narrow-

minded, not thinking about India as a whole nation. But he strongly retorted to them through his speeches in several conferences of the Depressed Classes, through his mouthpieces- Mook Nayak and Bahishkrut Bharat and also by taking up original researches in law, religions, economics, political, anthropology and philosophy. He articles evoked a spirit of and awareness among his people and they stood with him in sun and showers. It was not enough for India to be an independent country, she must rise as a good state guaranteeing equal status in matters religious, social, economic and political to all classes, offering every man an opportunity to rise in the scales of life and wanted to awaken the depressed classes to their disparities, take education and progress. He realized nothing would be gained by sitting inactively and begging for rights. Therefore he urged them to **'rise, learn and struggle'.**

It was for the first time that Ambedkar won his first victory in his public life, in 1920 at Nagpur when he spoke at All India Conference convened by the Untouchables. His skill of debate, presence of mind and his ability as a prospective leader were seen to a remarkable degree. This conference gave him a opportunity of turning the eyes of the untouchables from the Depressed Classes Mission.

**Dr. Ambedkar- a Reformer:**

The most important resolution that sped up Ambedkar's mission was one moved by S.K. Bole in 1923 allowed the untouchables to exercise the right of drinking water at all public places walls and dharmashalas which were built with and maintained out of public funds. Ambedkar was looking for social reforms in the sense of reorganization and reconstruction of Hindu society on the basis of equality. He was looking completed salvation. There was still conservative feeling, unmoved like a mountain, not ready to accept equality based society. He wanted to fight for it.

A man of great knowledge and boundless energy he was man who regard3ed the woes and miseries of those classes as a personal humiliation and thus had taken a vow to make self respecting citizens out of those virtual slaves. He urged the untouchability to fight for salvation. He cried out "You have been groaning from time immemorial and yet you are not ashamed to hug your helplessness as inviolability." His massage of self elevation soon gathered force. The Depressed Classes Mission took his cognizance and he started working vigorously. He emerged as a leader who had vision and intellectual energy to lead them to real salvation. His satyagrahas at Mahad and Nasik are just glimpses of it. At the same time Ambedkar paid attention to the

problems of textiles labors and railway workers. He fought a legal battle for them and won rights for them. Through his impressive speeches and pursuance he compelled the governments to make welfare laws for the labors and workers. Despite of his tussle with Gandhi over the issues of allocation separate electorates for the Untouchability, Ambedkar never looked back. Like a great warrior he won all battles and came triumphantly.

**The Reflection of Ambedkar's Mission in the Indian Constitution**.

The last battle of his mission was awaiting his valor. It was the battle of framing the constitution of free India. All missiles, powers, spiritual strength, legal scholarship was to put test which he managed with great intelligence and became the father of the unique Indian Constitution. The preamble of the constitution is itself self-explanatory of completion of his mission. His mission was only to win rights for the untouchables but to root out all the ills and create and constitute India into a, SOVERREIGN, SOCIALIST, SECULAR, DEMOCRATIC, RUPUBLIC and to secure all its citizen: JUSTICE, social, economic, and political; LIBERTY of thoughts, expression, belief, faith and worship-; EQULITY of status and of opportunity' and to promote among them all FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of Nation.

**Conclusion:**

Dr. Ambedkar himself converted into Buddhist and also jacks of his followers. His life and mission has been a beacon light for the ethnic India. Now all the Indians are reaping the rich harvest of **'justice, liberty, equality and fraternity'**. Now we are, to quote Ruskin Bond, **"the typical sons of soil; so terrifying in crowd, so beautiful in himself."**We must cherish the memories and keep the mission going on by **"defending the independence of this land to the last drop of our blood."**

## REFERENCES

1. Dr. Dahat, Dhanraj, Speeches and Thought of Dr. Babasaheb Amebdkar, Sanket Prakashan, Nagpur.
2. Skankararo Kharat, Dr. Babasaheb Ambedkar Yanche Dharmantar.
3. Dr. Jataw, D.R., Economical thoughts of Dr. Ambedkar.
4. Dr. Kasbe, Raosaheb, Dr. Ambedkar and Indian Constitution, Sugawa Prakashan ,Pune.
5. Granville, Austine, the Indian Constitution, Orient Longman.
6. Kothari , Rajani, Politics in India, Bombay, Orient Longman.
7. Ambedkar B.R., Annihilation of Caste, Jalandhar Bhimpatrika
8. Dr. Ambedkar, B. R. states and Mionorities: What Are Their Rights And How To Secure Of Free India, Bombay.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# चंद्रपुर जिल्ह्यातील सोयाबीन पिकविनाऱ्या शेतकऱ्यांचा उत्पादनविषयक स्थितीचा –एक अभ्यास

**डॉ. सुधीर न. बोढे**
गांधी ज्युनिअर कॉलेज
कोंढा तह.पवनी जि.भंडारा

## सारांश

सोयाबीनच्या उत्पादनविषयक स्थितीचे अध्ययन करताना असे लक्षात आले की, जिल्ह्यात साधारणपने १९९० पासून सोयाबीन पिकाच्या लागवडित वाढ झाल्याचे आढळून आले. आजही मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे उत्पादन घेतल्या जाते. या पिकापासून प्राप्त होणाऱ्या नफा तोट्यावरच शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अवलंबून आहे. संशोधन कालावधीत जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांना सोयाबीन पिकापासून कधी नफा तर कधी तोटा झाला आहे. जसे इ. स. २००३-२००४ मध्ये सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा तोटा प्रती एकर १६९३ रु. होता. इ.स. २००४-२००५ मध्ये प्रती एकर १०५० रु. एवढा तोटा झाल्याचे दिसून आले. इ.स. २००५-२००६ मध्ये प्रती एकर ४४१ रु. तोटा होता तर इ.स. २००६-२००७ आणि इ.स. २००७-२००८ या काळात सोयाबीन पिकासाठी नफा प्राप्त झाल्याचे दिसून येते. इ.स. २००६-२००७ मध्ये सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा प्रती एकर नफा ६३३ रु. होता तो वाढून इ.स. २००७-०८ मध्ये प्रती एकर १०६६ रु. झाल्याचे दिसून येते. परंतु या संपूर्ण वर्षाची सरासरी काढली असता सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला तोटा आल्याचे दिसून आले.

## प्रस्तावना

शेती हा एक प्राचीन काळापासून केला जाणारा परंपरागत व्यवसाय आहे. सुमारे १०,००० वर्षापूर्वी शेती व्यवसायाला सुरुवात झाली असे काही अभ्यासकांचे मत आहे. असे असेल तरी अजूनही विकसनशील आणि अल्पविकसित देशांमध्ये शेती व्यवसायाचे स्वरुप प्रामुख्याने उदरनिर्वाहाचे साधन किंवा जीवन जगण्याचा एक मार्ग असेच दिसून येते. विकसीत देशांमध्ये मात्र शेती हा शास्त्रीय पद्धतीने आणि व्यापारी तत्वावर केला जाणारा व्यवसाय आहे.

सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात विकसनशील देशांतील शेतीच्या स्वरुपातही आता बदल होत आहेत. या देशांमध्ये सुद्धा आता शेती व्यवसाय हा व्यापारी तत्वावर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. व्यापारी तत्वावर शेती करावची झाल्यास तिचे व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने होने ही काळाची गरज आहे.

आधुनिक काळातील शेतीचे स्वरुप विचारात घेता शेतकऱ्याला शेती उत्पादन व्यवस्थेमध्ये योग्य वेळी बदल करणे आणि योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण शेतकऱ्याने शेती करीत असतांना योग्य वेळी योग्य निर्णय घेतले तरच त्याचा परिणाम उपलब्ध साधनांचा योग्य वाटपावर आणि त्या साधनांच्या कार्यक्षम उपयोगावर होतो आणि पर्यायाने उत्पन्न वाढीवर होतो. शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायांतील उत्पादनांमध्ये निश्चितता असल्यामुळे तेथील निर्णय प्रक्रिया ही बरीचशी नियमित स्वरुपाची असते. या उलट शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीच्या मोठ्या प्रमाणावर अनिश्चितता दिसून येते. त्यामुळे या व्यवसायात निर्णय प्रक्रियेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. शेती व्यवसायात निर्णयांची अचूकता महत्वाची असते. महत्तम उत्पादनाचे उद्दिष्ट लागते.

शेतीमधील महत्तम उत्पादनाकरीता संसाधनांचे संघटन कसे करावे तसेच शेतीमधील उत्पादन प्रक्रियेतील विविध कार्याचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी शेती मधील उत्पादन प्रक्रियेत व्यवस्थापनाचे महत्व

दिवसेंदिवस वाढत आहे. शेतीच्या योग्य व्यवस्थापनाशिवाय शेतीतून भरघोस उत्पादन काढता येणे अशक्य आहे. सोयाबीन पिकाच्या बाबतीत सुद्धा महत्तम उत्पादनाचे उद्दिष्ट गाठवयाचे असेल तर त्यात अचूक निर्णय घेणे आणि सोयाबीन पिकाचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यावश्यक ठरते.

प्रस्तुत अभ्यासक्षेत्र असलेल्या चंद्रपुर जिल्ह्यामध्ये शेतकरी स्वतःच्या शेतात विविध पिकांमध्ये शेतकरी सोयाबीन पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर करीत असतो. चंद्रपुर जिल्ह्यात दरवर्षी सुमारे ४,४२,००० हेक्टर क्षेत्रवार सोयाबीनची लागवड केल्या जाते. सोयाबीन हे एक नगदी पिक असल्यामुळे आणि चंद्रपुर जिल्ह्यातील जमीन सोयाबीन पिकासाठी अनुकूल असल्यामुळे इतर पिकांच्या तुलनेत शेतकरी सोयाबीन पिकाची लागवड जास्त प्रमाणात (सुमारे ५० % क्षेत्रवार ) करीत असल्याचे सर्वेक्षणामध्ये आढळून आले. त्यामुळेच इतर पिकांच्या तुलनेत अधिक लागवड क्षेत्र असलेल्या सोयाबीन पिकाच्या उत्पादनात व्यवस्थापनाला अत्यंत महत्व आहे. कारण महत्तम उत्पादनावर आणि योग्य उत्पन्न प्राप्तीवरच शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिति अवलंबून असते.

## सोयाबीन उत्पादन खर्च

सोयाबीन पिक घेण्यासाठी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला सोयाबीन लागवड करण्यापूर्वीच्या जमिनीच्या पूर्व मशागत खर्चापासून तर शेवटी सोयाबीन बाजार पेठेत नेऊन सोयाबीनची विक्री होईपर्यंत निरनिराळ्या स्तरावर निरनिराळ्या प्रकारचा खर्च करावा लागतो. सोयाबीन पिकाचा उत्पादन खर्च काढण्याकरिता उत्पादनासाठी लागलेल्या मजूरांची आणि उपयोगात आणलेल्या साधन सामग्रीची तपशीलवार नोंद करुण ठेवणे आवश्यक असते.

उदा.पूर्वमशागत, बी-बियाने,पेरणी,रासायनिक खते, आंतरमशागत (डवरण आणि निंदन) किटकनाशक औषधि , सोयाबीनची वाहतूक आणि विक्री इत्यादि खर्चाच्या प्रकारनुसार आणि शक्य झाल्यास भूखंडानुसार सोयाबीन पिकाच्या उत्पादनासाठी आलेल्या खर्चाची नोंदी करुण ठेवणे आवश्यक असते. अशा नोंदी अचूकपणे करुण ठेवल्यास शेवटी खर्च उत्पन्नाचा ताळमेळ लावणे सोपे जाते. जिल्ह्यातील सोयाबीन पिकाच्या उत्पादन खर्चाची माहिती मिळवण्याकरिता केलेल्या सर्वेक्षणानंतर असे निदर्शनास आले की, सोयाबीन उत्पादक शेतकरी सोयाबीनचे पिक घेण्याकरिता त्याचा शेतामध्ये अनेक कामे करतो.

त्यासाठी किती खर्च येतो याची माहिती खालीलप्रमाणे आहे.


### सोयाबीन पिकाचा एकरी उत्पादन खर्च (रुपयात)

| अ. क्र. | खर्चाचे घटक | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
| १) | नांगरणी | ३०० | ३५० | ४०० | ४५० | ५०० |
| २) | वखरणी | १०० | १०० | १५० | १५० | १५० |
| ३) | कचरा वेचाई | १०५ | १०५ | १२० | १२० | १५० |
| ४) | बियाने | ४५० | ४५० | ५४० | ५४० | ६०० |
| ५) | पेरणी खर्च | २५० | २५० | २५० | ३०० | ३०० |
| ६) | रासायनिक खते | २५० | २५० | २५० | ३०० | ३०० |
| ७) | रासायनिक खत देने | १०५ | १०५ | १२० | १२० | १५० |
| ८) | किटकनाशके | १०० | १०० | १५० | १५० | २०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९) | फवारणी खर्च | ८० | ८० | १०० | १०० | १०० |
| १०) | डवरणी खर्च | ३०० | ३०० | ४०० | ४०० | ४०० |
| ११) | निंदन खर्च | ३०० | ३०० | ४०० | ४०० | ५०० |
| १२) | कापनी खर्च | २०० | २०० | २०० | २५० | २५० |
| १३) | मळणी | ७०० | ७०० | ८०० | १००० | १००० |
| १४) | विक्री खर्च | २६९ | २७८ | ३५५ | ३७५ | ३९० |
| १५) | व्यवस्थापन खर्च | १२६० | १२६० | १४४० | १४४० | १८०० |
| १६) | कर्जावरील व्याज | ५२४ | ५३० | ६२६ | ६७२ | ७४४ |
| १७) | जमिनीचे भाडे | १५०० | १५०० | २००० | २००० | २००० |
| | **एकूण खर्च** | **६९४३** | **७००८** | **८४४१** | **८९६७** | **९७३४** |

आधार प्रत्यक्ष सर्वेक्षणातून प्राप्त माहितीच्या आधारे :

सोयाबीन पिकाचा एकरी उत्पादन खर्च (रुपयात)




आधार प्रत्यक्ष सर्वेक्षणातून प्राप्त माहितीच्या आधारे :

टिप :

व्यवस्थापन खर्च . या ठिकाणी व्यवस्थापन खर्चाचा विचार करताना सोयाबीन पिकाचा एकूण कालावधी ९० दिवसांचा असतो. त्यामुळे ९० दिवस पिकाची काळजी घेण्यासाठी परिवारातील एका सदस्याला शेतीवर जावे लागते .त्यामुळे त्या व्यक्तीस त्या काळात बाहेर कामासाठी गेल्यामुळे जी मजूरी मिळाली असते तेवढा मोबदला व्यवस्थापन खर्च म्हणून विचारात घ्यावा लागेल .एक व्यक्ति पाच एकर जमिनिवरील पिकाचे व्यवस्थापन खर्च हा ) प्रत्येक वर्षी असलेले मजूरीचे दर गुणिले ९० दिवस) व्यवस्थापन कालावधी ( भागीले ५ एकर ( या सूत्राद्वारे काढला आहे .उदा .इ .स . २०००-०१ मध्ये मजूरी दर ७० रु .होता त्यामुळे ७० × ९० = ६३०० ÷ ५ एकर = १२६० रु ( .प्रति एकर व्यवस्थापन खर्च हा १२६० रु .एवढा विचारात घेतलेला आहे ) .मजूरी दर इ .स .२०००-०१ मध्ये ७० रु.,इ .स .२००१-०२ मध्ये ७० रु., इ.स .२००२-०३ मध्ये ८० रु.,इ.स .२००३-०४ मध्ये ८० रु,इ.स .२००४-०५ मध्ये १०० रु. असे होते .

१) विक्री खर्च : या खर्चात वाहतूक खर्च आणि अड्त, हमाली या खर्चाचा समावेश होतो. वाहतूक खर्च ( घर ते बाजार ) प्रति एकर इ. स. २००२-०३ ते २००४-०५ या तीन वर्षात तो २५० रु. प्रति एकर होता. या तीन वर्षात अड्त १.२५ रु. प्रति शेकडा व हमालीचे दर प्रति क्विंटल ८.०० रु. एवढे होते.

२) सोयाबीन उत्पादनासाठी बहुतांश शेतकरी शेणखताचा वापर करीत नसल्याने सोयाबीन उत्पादन खर्चात शेणखतावरील खर्चाचा विचार केला नाही.

सारणी वरुण असे निदर्शनास येते की, सोयाबीन पिकासाठी येणारा प्रति एकर उत्पादन खर्च इ.स.२०००-०१ मध्ये ६९४३ रु.,इ. स. २००१ -०२, मध्ये ७००८ रु., इ. स. २००२ -०३ मध्ये ८४४१ रु.,इ. स. २००३ -०४ मध्ये ८९६७ रु.आणि इ. स. २००४-०५ मध्ये ९७३४ रु.एवढा असल्याचे दिसून येते.हा खर्च दरवर्षी वाढत असल्याचे दिसून येते.

### सोयाबीन पिकाचे उत्पादन आणि उत्पन्न


जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादन आणि उत्पन्नाबाबत सर्वेक्षण केले असता खालील परिस्थिति आढळून आली.

### सोयाबीन उत्पादन आणि उत्पन्न

| अ. क्र. | वर्ष | उत्पादन प्रति एकर (क्विंटलमध्ये ) | भाव प्रति क्वि. (रु.) | उत्पन्न प्रति एकर (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ (३×४) |
| १) | २०००-०१ | ७ | ७५० | ५२५० |
| २) | २००१-०२ | ७ | ८५० | ५९५० |
| ३) | २००२-०३ | ८ | १००० | ८००० |
| ४) | २००३-०४ | ८ | १२०० | ९६०० |
| ५) | २००४-०५ | ८ | १३५० | १०८०० |

आधार प्रत्यक्ष सर्वेक्षणातून प्राप्त माहितीच्या आधारे :

### सोयाबीन पिकाचे एकरी उत्पन्न ( रुपयात )




आधार सारणी :

सारणी वरुण असे निदर्शनास येते की, चंद्रपुर जिल्ह्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या सोयाबीन च्या उत्पन्नात संशोधन कालावधीत दरवर्षी वाढ होत आहे. जसे इ. स. २००० – ०१ मध्ये जिल्ह्यातील सोयाबीनचे उत्पन्न प्रति एकर ५२५० रु. त्यात वाढ होऊन ते इ. स. २००४-०५ यावर्षी प्रति एकर १०८०० रु. एवढे झाले. सोयाबीन उत्पन्नात घडून आलेली वाढ ही एकरी उत्पादनात झालेल्या वाढीमुळे आणि प्रामुख्याने सोयाबीनला प्राप्त होणाऱ्या भावात झालेल्या वाढीमुळे झाली आहे.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

### सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा नफा तोटा


जिल्ह्यात साधारणपणे १९९५ पासून सोयाबीन पिकाच्या लागवडीत वाढ झाल्याचे सर्वेक्षणामध्ये आढळून आले . आजही मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे उत्पादन घेतल्या जाते. या पिकापासून प्राप्त होणाऱ्या नफा तोट्याविषयी जिल्ह्यात खालील परिस्थिति आढळून आली.

### सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा नफा ( रुपयात ) तोटा -

| अ. क्र. | वर्ष | उत्पन्न प्रती एकर (रु.) | उत्पादन खर्च प्रती एकर (रु.) | नफा प्रति एकर (रु.) | तोटा प्रती एकर (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ (३-४ ) | ६ ( ४-३) |
| १) | २०००-०१ | ५२५० | ६९४३ | - | १६९३ |
| २) | २००१-०२ | ५९५० | ७००८ | - | १०५८ |
| ३) | २००२-०३ | ८००० | ८४४१ | - | ४४१ |
| ४) | २००३-०४ | ९६०० | ८९६७ | ६३३ | - |
| ५) | २००४-०५ | १०८०० | ९७३४ | १०६६ | - |

आधार प्रत्यक्ष सर्वेक्षणातून प्राप्त माहितीच्या आधारे :

### सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा नफा ( रुपयात) तोटा -




आधार सारणी :

सारणी वरुण असे निदर्शनास येते की , संसोधन कालावधीत जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सोयाबीन पिकापासून कधी तोटा झाला आहे. जसे इ. स. २०००-०१ मध्ये सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा तोटा प्रती एकर १६९३ रु होता. तर इ. स. २००१-०२ मध्ये प्रती एकर १०५० रु. एवढा तोटा झाल्याचे दिसून येते. इ. स. २००१-०२ मध्ये प्रती एकर ४४१ रु. तोटा होता. इ.स. २००४-०५ या काळात सोयाबीन पिकापासून नफा प्राप्त

झाल्याचे दिसून येते. इ.स. २००३-०४ मध्ये सोयाबीन पिकापासून प्राप्त होणारा प्रती एकर नफा ६३३ रु- होता तो वाढून इ. स. २००४-०५ मध्ये प्रती एकर १०६६ रु. झाल्याचे दिसून येते. सोयाबीन उत्पादन मिळाल्यानंतर योग्य उत्पन्न प्राप्तीसाठी शेतकऱ्यांना कच्चा मालाच्या स्वरुपातील सोयाबीन योग्य किंमतीला बाजारात विकणे आवश्यक असते.

## निष्कर्ष

१) प्रती एकर सोयाबीन उत्पादक खर्च भरमसाठ आहे . तो दरवर्षी वाढत असल्याचे दिसून येते.

२) सोयाबीन पिकाचे दरवर्षी उत्पन्न सारखे नाही. हे उत्पन्न उत्पादनांवर व प्राप्त होणाऱ्या हमी भावावर अवलंबून आहे.

३) सोयाबीन उत्पादन खर्चावर आधारित भाव/किंमत मिळत नाही .त्यामुळे उत्पादकाला कधी नफा तर कधी तोटा होत आहे .

४) जिल्ह्यात कोरडवाहू शेतीचे प्रमाण फार मोठे आहे .

५) सोयाबीन पिकाचे लागवडीचे प्रमाण इतर पिकांच्या तुलनेत सर्वाधिक आहे .

६) शेतकरी मातीचे परिक्षण करीत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे जमिनीमध्ये कोणते घटक उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची माहिती त्यांना मिळत नाही.

७) सोयाबीन उत्पादक प्रक्रियेत शेतकऱ्यांना नैसर्गिक व आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागतात.

८) प्रभावी शेतकरी संघटनेचा अभाव आढळून आला.

## शिफारशी

१) सोयाबीन उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यात यावा. त्यामुळे आर्थिक क्षमतेत वाढ होऊन जीवनस्तर सुधारेल.

२) या भागातील मुख्य पिक सोयाबीन व इतर पिकांसाठी पाणी पुरवठ्याच्या सोई उपलब्ध करून घ्याव्यात यासाठी सरकारने सिंचन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

३) या विभागात वेळोवेळी कृषि शिबिरे ,कृषि मेळावे, शेतकी प्रत्यक्षीकेआयोजित करून तज्ञ व्यक्तिमार्फत त्यांना शेतीविषयक माहिती देण्यात यावी.

४) सोयाबीनच्या जास्त उत्पादन देणाऱ्या जातीचे संशोधन करून त्याचे (वान) बियाने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे. त्यामुळे उत्पादकता वाढून आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारेल.

५) बाजार समितीचे सोयाबीनच्या विक्रीकरिता चांगला भाव मिळावा यासाठी प्रमाणीकरण व प्रतवारीची सोय उपलब्ध करून द्यावी.

६) या विभागातील शेतकऱ्यांना बाज़ारविषयक अद्ययावत माहिती मिळावी यासाठी सोयाबीन व इतर पिकांचे भाव वर्तमानपत्र, रेडियो यांच्या माध्यमातून प्रसारित करण्यात यावे. त्यामुळे त्यांचा लाभ घेऊन स्वतःचे विक्री निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त करता येईल.

७) सोयाबीन पिकविनाऱ्या शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे ( कधी कोरडा दुष्काळ तर ओला दुष्काळ ) होणारे नुकसान शासनाने पिक विमा योजनेतून भरून द्यावे. कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी शासनाने पिक विमा योजनेचे हप्ते भरावे.

८) बियाने, खते आणि किटकनाशकांच्या किमतीवर शासनाचे नियंत्रण असावे .

९) माती परीक्षण प्रयोगशाळांची आणि मार्गदर्शन केंद्राची तालुकास्तरावर स्थापना करावी.

**संदर्भ ग्रंथ**

१) चंद्रपुर ज़िल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
२) कायंदे पाटिल, गंगाधर वि . – शेतीचे अर्थशास्त्र
३) वाघमारे, र .ए. आणि भापकर, द. गो. – शेतीचे हिशोब
४) देशमुख, प्रभाकर – भारतीय शेतीचे अर्थशास्त्र
५) महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिति महामंडल , पुणे – सामान्य भूगोल चंद्रपुर इयत्ता ३ री

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# पर्यावरण आणि आर्थिक विकास

**डॉ. एस. एस. कावळे**
प्राचार्य तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री.गोविंदप्रभु कला व वाणिज्य महा.
तळोधी (बाळापूर) ता. नागभीड
जि. चंद्रपूर

**प्रस्तावना :**

पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली परिस्थिती होय. Environ म्हणजे to surround या मुळे फ्रेंच शब्दापासून 'Environment' असा इंग्रजी शब्द प्रचलित झाला आहे. यालाच पर्यावरण असे मराठीत म्हणतात. पर्यावरणाला अलिकडील काळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे पर्यावरण या विषयावर जागतिक परिषद घेतली गेली तेव्हापासून प्रामुख्याने विकसनशिल देश याकडे गांभीर्याने पाहतात. विकास साधतांना पर्यावरणाचा समतोल राखने आवश्यक आहे. औद्योगिक क्रांतीनंतर नवनविन शोध लागले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जग जलद गतीने पुढे जात आहे. भविष्य काळातही विकासाची प्रक्रीया सुरूच राहणार आहे. त्याकरिता नैसर्गिक साधनांचा वापर हा प्रचंड प्रमाणात होत असून त्याच्या वापरात आणखी भर पडणार आहे. प्रामुख्याने प्रेरकशक्ती, खजिनद्रव्ये आणि हवा, पाणी, भूमी यासारख्या घटकांचा उपयोग वाढत आहे. त्यामुळे त्यातून निर्माण हाणारा कचरा टाकाऊ वस्तु, विषारी वायु इत्यादींचा पर्यावरणावर सातत्याने परिणाम होत आहे. हा होणारा परिणाम पर्यावरणातील नैसर्गिक पुन:निर्मिती क्षमतेपेक्षा कमी असल्यास विशेष वाईट परिणाम होणार नाही, परंतु जर तो जास्त असेल तर मात्र पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होतो. आणि नैसर्गिक साधनांची अवनती होऊन वर्तमान आणि भावी पिढीवर सुध्दा त्याचे वाईट परिणाम होऊ लागतात.

**पर्यावरण ऱ्हासातून आर्थिक विकास :**

मागील अनेक वर्षापासून विकास प्रक्रीया सुरू झालेली आहे. त्यातून आर्थिक समृध्दी लाभली आहे. परंतु पर्यावरणाचा मात्र विनाश होत आहे. जीवनाला आधारभूत अशा हवा, पाणी आणि भूमी हयावर अनिष्ट परिणाम होत आहे. आर्थिक विकास वाढू लागले म्हणजे कचरा, टाकाऊ पदार्थ, विषारी वायु इत्यादींचे प्रमाण वाढल्याने या सर्वाचा समाजजीवनावर अनिष्ट परिणाम होत आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यातील काही निवडक समस्यांकडे प्रस्तुत शोध निबंधातुन लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. विकास आणि पर्यावरण यांच्याशी काय संबंध आहे. जगाच्या निर्मितीचा पृथ्वी व पर्यावरण यांच्याशी अगदी जवळचा संबंध आहे. या पृथ्वीवर आपण रोज कर्म करतो, उठतो, जागतो, निद्रा घेतो किंवा विश्रांती घेतो, श्रम करतो, उत्पन्न मिळवितो, खर्च करतो. आपण येथे आपल्या पालनपोषनासाठी आवश्यक असे सर्व काही पृथ्वीपासून प्राप्त करतो. या पृथ्वीवरील वनस्पती, पशु, पक्षी हे सर्व आपल्याला पोषक तत्वे प्रदान करतात. अधिकाधिक धान्य मिळवित असतांना आपण यांत्रिक शेतीचा वापर करतो, रासायनिक खतांचा वापर करतो, आज प्रमाणाबाहेर हया घटकांच्या वापरामुळे जमीनीची शक्ती वेगाने वापरली जात आहे. खतांमुळे

**Gurukul** International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

आपल्याला अधिक अन्नधान्य मिळते, परंतु हे अन्नधान्य जमीनीतील उत्पादन शक्तीचा एकदम वापर करून निर्माण झालेले आहे. जमीनीची उत्पादन शक्तीचा एकदम वापर केल्यामुळे हजारो एकर जमीन नापिक होत आहे. अमेरिकेत अशी हजारो एकर जमिन नापिक झालेली आहे. आणि असाच वापर होत राहीला तर येत्या ५० वर्षात अमेरिकेची शेती नापिक होईल असे भाकित केले आहे. रासायनिक खतांच्या वापराबाबत पुर्नविचार होऊ लागला आहे. रासायनिक खतांच्या परिणामुळे कोबी, टोमॅटो इ. भाजिपाला लागवड वाढत आहे. परंतु त्यातील जीवनसत्व मात्र कमी होत आहे. भाजीपाल्यांमधील रासायनिक द्रव्यांच्या परिणामामुळे मानवी शरीरावर परिणाम होऊन रोगांचा फैलाव होत आहे.

मानवाने विकासाच्या नावाखाली भौतिक सुखासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीची लुट चालविली आहे. संतुलन साधण्यासाठी आवश्यक असलेले घटक प्रमाणशीर असावयास पाहिजे परंतु आणखीनच त्यात घट होत आहे. देशातील एकूण भूप्रदेशातील ३३ टक्के भाग हा जंगलानी व्याप्त असावयास हवा परंतु २२ टक्के भाग वन व्याप्त असून त्यातही अलिकडे घट होत आहे. त्या नैसर्गिक शक्तीत एक प्रकारची धारण क्षमता असते. त्यावर जर कोणी अतिक्रमण केले तर निसर्ग हा त्याचा बदला घेतल्याशिवाय राहत नाही. ही गोष्ट आता विज्ञानाने सिध्द केली आहे.

जगातील नैसर्गिक साधनांचा वापर अमर्यादीत होत आहे. एकप्रकारचे शोषण होत आहे. विकसित देशातील हया शोषणाचा विकसनशिल देशाला परिणाम भोगावा लागत आहे. उदाहरण म्हणून अमेरिकेचे घेता येईल. अमेरिकेत जगाच्या लोकसंख्यापैकी चार टक्के लोक राहतात आणि जगातील साधनसंपत्तीपैकी चाळीस टक्के संपत्तीचा उपयोग अमेरिका घेत आहे. जगातील मोजकी मोठी राष्ट्रे की ज्यात जगातील लोकसंख्येच्या अत्यल्प लोकसंख्या राहत असून मोठी संपत्ती उपभोगतात आणि विकसनशिल देशांवर त्याचा आरोप असतो की, हया देशांमुळे प्रदुषण वाढत आहे. खरे म्हणजे जे पूर्णसत्य नाही. म्हणून जोपर्यंत विकसित देशा आपल्या स्वत:च्या जीवनमानात, पध्दतीत बदल करीत नाही तोपर्यंत प्रदुषण कमी होणार नाही. विविध प्रकारचा कच्चा माल मिळविण्यासाठी प्रयत्न करतांना जंगलाचा नाश होतो. जलप्रदुषण घडून येतो. त्याचा मानसूनवर परिणाम होतो हया सर्व गोष्टी परस्परावलंबी आहेत. हे सर्व घडत आहे ते पाश्चात्यांच्या विकास प्रतिमानामुळे व त्यांच्या विचारसरणीमुळे.

आम्हालाही आमचा विकास करून घ्यावयाचा आहे. आपण विकासासाठी कोणती पध्दती, कोणते प्रतिमान वापरायचे हा महत्वाचा प्रश्न आहे. पाश्चात्यांचे अनुकरण करायचे काय हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यांची विचारसरणी सर्व पृथ्वी आपल्या उपभोगासाठी आहे. त्यामुळे त्यांच्याशी आपल्याला हवे ते खेळ करता येतात. माणूस वगळता इतर सर्व जड आहे. त्यामुळे त्यांचे कितीही शोषन करा

कसलेही बंधन नाही. या वृत्तीमुळे आज निसर्गाचा विध्वंश पाश्चात्य देशात चालु आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे.

**पर्यावरणाचा समतोल :**

या जगात प्रत्येक जीवजंतूच्या अस्तित्वामागे प्रयोजन आहे. त्यामुळे त्यांना जीवंत ठेवणे, त्यांचे अस्तित्व कायम ठेवणे आवश्यक आहे. निसर्ग व समाज यांच्यात संतुलन साधून आपला विकास मार्ग निश्चित करण्यासाठी निसर्गाला धरून चला, निसर्गाबरोबर चला हे तत्व मान्य करणे आवश्यक आहे. आपण निसर्गाच्या प्रत्येक घटकाला माता म्हणून संबोधले आहे. धरतीला आपण माता म्हणतो, नदीला आपण माता म्हणतो, तुळस, वटवृक्ष इत्यादी वृक्षांना पुजतात. सापाला दुध पाजतात. यातही नैसर्गिक पर्यावरण समतोल साधला जातो. अशाप्रकारचे मॉडेल सर्व विकसित देशांनी अवलंबिले तर निश्चितपणे पर्यावरण समतोल राखण्यास मदत होईल. मानवाने कितीही वैज्ञानिक प्रगती केली तरी या सर्व नैसर्गिक संपत्तीला पर्याय देता येणार नाही. सजीवाला जिवंत राहण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. त्याचे संरक्षण होणे गरजेचे आहे. त्याकरीता निसर्गाकडून आपण गरजेपूरते कमीत कमी घ्यावे. तिची हानी होईल जी भरून काढावी आणि प्रत्यक्षात उत्पादनही सुरू ठेवावे. म्हणजे पर्यावरण आणि विकास दोन्ही कायम टिकून राहतील.

**Gurukul** International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)

ISSN No. 2394-8426
Mar – 2015
Issue – I, Volume – II

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विश्व चेतना के संदर्भ में....

डॉ. रमेशकुमार वि. गवळी
असोसिएट प्रोफेसर एवं अध्यक्ष,
स्नातक तथा स्नातकोत्तर हिंदी विभाग, कृष्णा महाविद्यालय रेठरे बु।।
ता. कराड, जि. सतारा (महाराष्ट्र)
पत्राचार का पताः–
गवळी गल्ली, कापूसखेड नाका, इस्लामपुर, ता. वाळवा, जि. सांगली
पिनः–415409 (महाराष्ट्र) Mo. 09850156998
Email- rameshkumar1075@gmail.com

